रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १०६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) 



# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १३ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

हे गणराया तुला वंदिते
सप्तसुरांची फुले वाहते..
तुझे रुप दिसे ठायी ठायी रे,
सकल सृष्टी नाम तुझे नित्य घेई रे...
॥ गजानना श्री गणराया,
आधी वंदू तूज मोरया ! ...॥

# रोह्यात भीषण स्फोट

## दोन कामगार ठार, चारजण जखमी

| रायगड | खास प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीमध्ये असणाऱ्या साधाना नायट्रोकेम लि. या केमिकल कंपनीतील ओडीबी२ केमीकल प्लाँटमध्ये गुरुवारी (दि.१२) भीषण स्फोट झाला. सकाळी सव्वा अकराच्या सुमारास ही घटना घडली. त्यामध्ये दोन कामगारांचा मृत्यू झाला, तर चारजण जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल केल्याची माहिती रायगडचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

स्फोट इतका भीषण होता की, याचा आवाज परिसरात एक किलोमीटर लांबपर्यंत ऐकू गेला. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, घटनास्थळी अग्निशमन यंत्रणा दाखल झाली. त्यांना आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी बराच काळ प्रयत्न करावा लागला. केमिकल कंपनीतील ओडीबी२ प्रॉडक्ट वॉशिंग करण्यासाठी असलेल्या मेथानोल केमिकलच्या स्टोरेज टँकवर एमके फॅब्रिकेटर्सचे सहा कामगार वेल्डिंग काम करीत होते. त्यावेळी स्फोट होऊन सहा कामगार जखमी झाले. या अपघातात दोन कामगार ठार झाले, तर अन्य चार जण जखमी झाले.

या एमआयडीसीमध्ये यापूर्वीही अनेकवेळा वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये आग आणि स्फोटाच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये अनेक निष्पाप कामगारांचे प्राण गेले आहेत, तर काहींना अपंगत्व आले आहे. असे असूनही इथे कामगारांच्या सुरक्षतेकडे दुर्लक्ष केले जात आहे. सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान ज्या कंपनीमध्ये स्फोट झाला ती, केमिकलची •> पान २ वर

रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीतील साधाना नायट्रोकेम लि. या केमिकल कंपनीतील ओडीबी२ केमीकल प्लाँटमध्ये भीषण स्फोट झाला. सदरचा स्फोट मोठा असल्याने त्याचा आवाज परिसरातील एक किलोमीटर परिसरात गेला. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. थोडा वेळ काय झाले, कसला आवाज होता. याबाबत काहीच समजले नाही. त्यामुळे नागरिक चक्रावून गेले होते. त्यानंतर धाटाव एमआयडीसीत स्फोट झाल्याची माहिती समोर आली.



स्फोटात जखमी झालेल्या कामगारांपैकी दिनेश कुमार, संजित कुमार या दोघांचा मृत्यू झाला तर निलेश भगत, बासकी यादव, अनिल मिश्रा व सुरेंद्र कुमार हे कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

**स्फोट झाल्याची माहिती मिळताच परिसरातील अग्नीशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. तसेच पोलीस देखील तातडीने दाखल झाले. अग्नीशमन दलाने आग विझवण्यास सुरुवात केली आणि बचाव कार्य सुरु केले. सहा कामगार जखमी झाल्याचे त्यांना दिसून आले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. सहा पैकी दोघांचा मृत्यू झाला असून अन्य चौघांवर उपचार सुरु आहेत.**



# कॉ. सिताराम येचुरी यांचे निधन

**मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे नेते सिताराम येचुरी यांचे गुरुवारी (दि.१२) निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

ज्येष्ठ माकप नेते सिताराम येचुरी यांचे निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या महिनाभरापासून सिताराम येच्युरी यांच्यावर उपचार सुरु होते. त्यांच्यावर दिल्लीतील एम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते अतिदक्षता विभागात होते.

सिताराम येचुरी यांच्या जाण्याने कम्युनिष्ट पक्षाने बुद्धीवादी चेहरा गमावला आहे. सीताराम येचुरी यांचा जन्म १२ ऑगस्ट १९५२ ला मद्रास (चेन्नईत) एका तेलुगू भाषिक ब्राह्मण परिवारात झाला होता. त्यांचे वडील सर्वेश्वर सोमयाजुला येचुरी हे आंध्र प्रदेश राज्य रस्ते परिवहन विभागात इंजिनियर होते. तर त्यांच्या आई कल्पकम येचुरी एक सरकारी अधिकारी होत्या. सीताराम येचुरी यांनी नवी दिल्लीच्या प्रेसिडेंट्स एस्टेट स्कुलमध्ये शिक्षण घेतलं होतं. तसेच त्यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्डाच्या सीताराम येचुरी हे जेएनयूमध्ये शिक्षण घेत असताना राजकारणात सक्रिय झाले होते. ते जेएनयू विद्यार्थी संघाचे तीनवेळा अध्यक्ष बनले होते. येचुरी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानाबाहेर पत्रक वाचून प्रसिद्धीच्या झोतात आले होते. त्यांचं ते आंदोलन चांगलंच गाजलं होतं. सीताराम येचुरी हे माजी सरचिटणीस हरकिशन सिंग सुरजीत यांचा आघाडी उभारणीचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी ओळखले जातात. त्यांनी १९९६ मध्ये काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांच्यासोबत संयुक्त आघाडी सरकारसाठी किमान समान कार्यक्रमाचा मसुदा तयार केला होता. त्यांनी २००४ मध्ये यूपीए सरकारच्या स्थापनेदरम्यान आघाडीत महत्त्वाची भूमिका बजावली होती. आयुष्यभर त्यांनी कम्युनिष्ट पक्षाचं काम जोमाने केलं. विशेष म्हणजे भारतात कम्युनिष्ट पक्षाच्या वाढीचा आणि पक्षाला उतरती कळा लागण्याचा काळही येच्युरी यांनी पाहिलेला आहे. सध्याच्या काळाच्या त्यांनी केरळमधील सरकारमध्येही महत्वाची भूमिका बजावली होती.

> कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) सरचिटणीस तत्वनिष्ठ, संघर्षशील, अभ्यासू, जीवनदानी, त्यागी कम्युनिस्ट नेते कॉ. सीताराम येचुरी यांच्या निधनाने देशातील डाव्या चळवळीचे कधीही भरून न निघणारे अपरिमित नुकसान झाले आहे. कॉ. सीताराम यांच्याशी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. रायगड जिल्ह्यातील सेझविरोधी आंदोलन असो की, इतर कोणतेही आंदोलन कॉ. सीताराम यांचे मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष सहभाग यासाठी आमचा आग्रह असायचा आणि ते आवर्जून पक्षाच्या विनंतीला मान देऊन उपस्थित राहायचे. कॉ. येच्यूरी यांच्याच नेतृत्वात आम्ही रिलायन्सच्या मुंबई सेझविरोधी लढा उभारून विजय मिळविला. कष्टकऱ्यांच्या चळवळीचे राजकारण करणारा सच्चा सहकारी आणि मुत्सद्दी नेता हरपला आहे. धार्मिक विद्वेषाचे राजकारण चरमसीमेवर असताना, त्याचा बीमोड करण्याचे राजकीय कौशल्य असलेल्या अभ्यासू नेत्याची उणीव क्षणोक्षणी जाणवणार आहे.
>
> – जयंत पाटील
> सरचिटणीस, शेकाप

# आनंदाश्रूंनी निरोप

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी गुरुवारी (दि. २) वाजत गाजत, बाप्पासह गौरीला निरोप देण्यात आला. गणपती बाप्पा मोरया.... गणपती चालले गावाला चैन पडे ना आम्हाला... असा भावपुर्ण जयघोष करीत तलाव, नदी, समुद्रात आणि कृत्रिम तलावांमध्ये ६० हजार ८५५ हून अधिक मुर्तींचे विसर्जन करण्यात आले. मंगलमय वातावरणात हा आनंदोत्सव सोहळा पार पडला असला, तरीदेखील सहा दिवसांच्या पाहूणचारानंतर बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले.

दुपारी चारनंतर आरती झाल्यावर गणरायाच्या मिरवणूकीला सुरुवात झाली. काही ठिकाणी बेंजोसह काही ठिकाणी डिजे, स्पीकर अशा अनेक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. काही ठिकाणी गणपतीच्या गाणी तर काही ठिकाणी मराठी, हिंदी गाण्यांच्या ठेक्यावर नाचत अनेकांनी मिरवणूकीत सहभाग घेतला. त्यासोबत भजनांचा जल्लोषही दिसून आला. वयस्कर मंडळीसमवेत तरुण मंडळीदेखील भजनामध्ये मग्न झाले होते. काही ठिकाणी पारंपारिक पध्दतीने डोक्यावर तर काही ठिकाणी कार, रिक्षा, हातगाडीवर बाप्पाची मुर्ती ठेवून विसर्जन स्थळापर्यंत मिरवणूक काढली. •> पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

## कृत्रिम तलावांना पसंती

अलिबाग नगरपरिषदेबरोबरच जिल्ह्यातील २५ हून अधिक ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात आले होते. पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच पाण्याचा प्रदुषण रोखण्यासाठी हा उपक्रम वेगवेगळ्या शासकिय यंत्रणेसह खासही संस्थाच्या माध्यमातून राबविण्यात आला होता. कृत्रिम तलावाच्या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी लहान मुर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करून या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

> गणेशमुर्ती विसर्जन करण्यासाठी आलेल्या भाविकांकडे असलेल्या निर्माल्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी किनारी निर्माल्य संकलन केंद्र नगरपरिषदेच्या वतीने उभारले होते. भाविकांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. निर्माल्य संकलन केंद्रात देऊन भाविकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला. मुर्तींचे समुद्रात विसर्जन करण्याबरोबरच कृत्रिम तलावामध्ये देखील विसर्जन करण्यावर नागरिकांनी भर दिला.
>
> – अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी, तथा प्रशासक अलिबाग नगरपरिषद,

## पुण्यावर ‘आयबी’ची नजर!

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

देशात सणासुदीचा काळ सुरू झाला असून सध्या सगळीकडे गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळत आहे. यादरम्यान दहशतवाद्यांकडून घातपाताची शक्यता लक्षात घेऊन सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर असतात. अशातच पुण्यातील रेल्वे ट्रॅकच्या सुरक्षेसाठी गुप्तचर यंत्रणेकडून रेल्वे प्रशासनाला काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्याची बाब समोर आले आहे.

रेल्वे ट्रॅकवरील घातपात कारवाईच्या पार्श्वभूमीवर पुण्यात सुमारे २० ठिकाणी ट्रॅकवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. तसेच, रेल्वे इंजिनमध्येदेखील कॅमेरे बसविले जाणार आहेत. रेल्वेच्या सुरक्षा बलाची नुकतीच केंद्रीय गुप्तचर विभागासोबत (आयबी) बैठक झाली असून, त्या पार्श्वभूमीवर ‘आयबी’ने रेल्वे प्रशासनाला सूचना केल्या आहेत. ‘आयबी’ने रेल्वे प्रशासनाला संशयित ठिकाणे सांगितले असून, त्याठिकाणी प्रामुख्याने कॅमेरे बसविले •> पान २ वर

# अंतिम सुनावणीकामी सेझ कंपनीची बाधा

| उरण | वार्ताहर |

रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे शेतकरी व सेझ कंपनी यांच्यामध्ये ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंतिम सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु सेझ कंपनीने उच्च न्यायालयामध्ये १० सप्टेंबर २०२४ रोजी जनहित याचिका दाखल केली आहे. याप्रश्नी सुनावणी घेऊन अंतिम निर्णय देण्यास मनाई करण्याची विनंती केली होती. त्यानुसार उच्च

**सेझग्रस्त शेतकऱ्यांना न्यायाची प्रतीक्षा**

न्यायालयाने जिल्हाधिकारी यांना १९ सप्टेंबर २०२४ पर्यंत अंतिम सुनावणी तात्पुरत्या स्वरुपात पुढे ढकलावी असे आदेश दिले आहेत. आता ९ ऑक्टोबरला सुनावणी पार पडणार असून उरण, पनवेल आणि पेणमधील ५२३ हुन शेतकऱ्यांना न्यायाची प्रतिक्षा आहे.

## मारहाण करणाऱ्या तरुणाला अटक

| नेरळ | वार्ताहर |

कर्जत तालुक्यातील नेरळ गावातील पाडा येथे एका कार चालकाला रबराचे दांडक्याने मारहाण करीत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. या घटननंतर सर्वत्र खळबख उडाली होती. मारहाण करणाऱ्या तरुणाच्या मुसक्या पोलीसांनी कल्याण येथे आवळल्या आहेत.

नेरळ गावातील पाडा भागातील राजबाग सोसायटीच्या गेट समोर (दि.७) सायंकाळी एका कारमधील चालकाला •> पान २ वर



## सात लाखांचा गांजा जप्त

| रायगड | खास प्रतिनिधी |

पोलादपूर तालुक्यातील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने गांजाची विक्री करणाऱ्याला एकाला अटक केली आहे. पोलिसांनी ७ लाख ३३ हजार रुपये किमतीचा २५ किलो गांजा जप्त केला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर पोलीस •> पान २ वर

# सोनं लपवणारा अटकेत

| पनवेल | प्रतिनिधी |

गुदद्वारात सोन्याचा भुसा लपवून चोरी करणाऱ्या एका कामगाराला कंपनीतील सुरक्षारक्षकांनी पकडल्याची घटना तुर्भे एमआयडीसीतील एका कंपनीत उघडकीस आली आहे. राजेश बुधवानी (वय ४८) असे आरोपी कामगाराचे नाव असून त्याने तब्बल दोन लाख १३ हजार किमतीचा सोन्याचा भुसा आपल्या गुदद्वारात लपवल्याचे आढळून आले. तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

राजेश बुधवानी हा तुर्भे एम आयडीसीतील ओरो प्रेशियस मेटल्स प्रा.लि.या कंपनीत सोने पॉलीश करण्याच्या मशीनवर ऑपरेटर •> पान २ वर

> आरोपी राजेश बुधवानी याला कंपनीतून सोन्याचा भुसा चोरून आपल्या गुदद्वारातून लपवून घेऊन जाताना पकडण्यात आले आहे. त्याच्याविरोधात कलम ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले होते. नंतर त्याला नोटीस बजावून सोडून देण्यात आले.
>
> – प्रकाश सकपाळ, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे.

## ‘ला निना’ सक्रिय होणार?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

प्रशांत महासागरात यंदाच्या वर्षअखेरीस ‘ला निना’ सक्रिय होण्याची ६० टक्के शक्यता असून, त्यामुळे उत्तर भारतात यंदाचा हिवाळा नेहमीपेक्षा कडक असू शकतो, असा अंदाज आहे. जागतिक हवामान संस्थेच्या दीर्घकालीन अंदाज केंद्राने हा अंदाज वर्तविला आहे. प्रशांत महासागरात सध्या न्यूट्रल स्थिती असून सध्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत या स्थितीत बदल होऊ ‘ला निना’ विकसित होण्याची ५५ टक्के शक्यता आहे. •> पान २ वर

**जागा वाटपात दगाफटका झाल्यास पाडापाडीचे राजकारण**

# महायुतीत चलबिचल

| आविष्कार देसाई |

**रायगड :** राज्यात विधानसभा निवडणूकांचे बिगुल आता काहीच दिवसात वाजण्याची शक्यता आहे. विविध राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपाचे सूत्र अद्याप ठरलेले नाही. अशातच आता महायुतीमधील प्रमुख घटक पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष



सुनील तटकरे यांनी रायगड जिल्ह्यातील कर्जत विधानसभेवर आपला हक्क राखून ठेवला आहे. त्यामुळे शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी जशास तसे उत्तर देण्याची तयारी केल्याने शिंदे गट विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात वितुष्ठ निर्माण झाल्याचे चित्र आहे.

जागा वाटपात काही दगाफटका झाला तर महायुतीमधील तणाव विकोपाला जाऊन पाडापाडीचे राजकरण होण्याची शक्यता नाकरता येणार नाही. तुर्तास खा. तटकरे यांनी आपल्या वक्तव्याने कर्जत मतदार संघात महायुतीमध्येच खळबळ उडवून दिल्याचे दिसून येते. काहीच दिवसांपूर्वी सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत कर्जतची जागा लढण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत. तसेच या विधानसभा मतदार संघातून त्यांच्याच पक्षाचे सुधाकर घारे यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. मतदार संघात आपणच विकासकामे करत असल्याचा दावा ते सातत्याने करत असून त्यामाध्यमातून ते विद्यमान आ.महेंद्र थोरवे यांना आव्हान देत असल्याचे सातत्याने दिसून आले आहे. याला •> पान २ वर

कृषीवल

रायगडच्या रणरागिणीला
विनम्र अभिवादन



माजी राज्यमंत्री
स्व. मीनाक्षीताई पाटील

तुमचं असणं सर्वकाही होतं... कष्टकरी, गरीब, कामगार अशा प्रत्येकाच्या आयुष्यातलं ते सुंदर पर्व होतं...
शून्यामधूनी विश्व् निर्मूनी, कीर्तीसुगंध वृक्ष फुलवूनी, लोभ, माया, प्रीती देवूनी, सत्य सचोटी मार्ग दावूनी
आज जयंतीनिमित्त तुमचे स्मरण करताना ग्वाही एवढीच...
॥ उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ॥

# अनधिकृत पार्कींगमुळे वाहतूक कोंडी

## अनधिकृत कंटेनर यार्डवर कारवाई करण्यास प्रशासनाचा चालढकलपणा

**। उरण । वार्ताहर ।**

महसूल विभागाच्या काही वसुली अधिकाऱ्यांमुळे वसलेल्या अनधिकृत कंटेनर यार्डच्या बाहेर उभे राहणारे ट्रेलर्स, मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी खराब झालेला रस्ता आणि रस्त्यात बंद पडलेले ट्रेलर्स या कारणामुळे सध्या पनवेल गव्हाण फाटा ते दिघोडे या रस्त्यात वाहतूक कोंडी नित्यनेमाने होत आहे. राजकीय नेत्यांची येथे अनधिकृत कंटेनर यार्ड आहेत. त्यांचे अधिकारी वर्गाबरोबर आर्थिक साटेलोटे असल्याने कारवाई होत नसल्याची चर्चा आहे.



याबाबत तहसीलदारांना उरण तालुका मराठी पत्रकार संघाने असे अनधिकृत कंटेनर यार्ड कायम स्वरूपी बंद करण्याची मागणी केली होती. परंतु तहसीलदार उद्धव कदम यांनी पत्रकार संघाची बैठक घेऊन लवकरच कारवाई करू, असे आश्वासन दिले होते. याला महिना उलटूनही याबाबत प्रशासन ठोस निर्णय घेण्यात अपयशी ठरताना दिसत आहे. याबाबत लवकरच उरण तालुका मराठी पत्रकार संघ जिल्हाधिकारी यांची भेट घेणार आहे.

उरण तालुक्यातील अनधिकृत कंटेनर यार्डवर कारवाई करण्यात यावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला.

रोज याठिकाणी वाहतूक कोंडी होत असून हे साडेसहा किमी अंतर जायला अर्धा ते एक तास एवढा वेळ लागतो. त्यामध्ये वेळेचा अपव्यय व पेट्रोल, डिझेलही वाया जाते. प्रवाशांना नियोजित ठिकाणी जायला आधिक वेळ लागतो. गेल्या काही महिन्यात या वाहतूक कोंडी मुळे काही अपघात देखील झाले आहेत.

ट्रेलर्सची अनधिकृत पार्किंग हेच वाहतूक कोंडीचे मुख्य कारण बोलले जात आहे. औद्योगिकि करणाच्या नावावर उरणचे मरण मात्र स्वस्त झाले आहे. संबंधित प्रशासनाने याकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. कारण भविष्यात या वाहतूक कोंडीमुळे जर एखादा मोठा अपघात घडला तर येथील जनता त्यांना माफ करणार नाही. उलट संबंधित अधिकारी वर्गांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

## सुधाकर शिंदे सेवानिवृत्त

**नागोठणे :** मुंबई गोवा महामार्गावरील नागोठण्याजवळील ऐनघर व वाकण येथील महामार्ग वाहतूक मदत केंद्रात प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक सुधाकर शिंदे हे पोलीस खात्यातील आपला ३६ वर्षांचा प्रदीर्घ सेवा कार्यकाळ पूर्ण करून वयाच्या ५८ व्या वर्षी नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त महामार्ग वाहतूक पोलीस केंद्र ऐनघर व वाकण येथील कर्मचाऱ्यांतर्फे त्यांना निरोप देण्यात आला. महामार्ग पोलीस खात्याच्या ऐनघर येथील वाहतूक मदत केंद्रात संपन्न झालेल्या या छोटेखानी निरोप समारंभ कार्यक्रमाला महामार्ग वाहतूक खात्याचे रायगड विभागाचे पोलीस निरीक्षक नरेंद्र वानखेडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गीतांजली जगताप, आदी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## ट्रकची मोटरसायकलला धडक, चालकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** ट्रकने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत मोटरसायकल चालकाचा मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रक चालका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तळोजा सीईटीपी जवळ ट्रक क्रमांक डी डी ०१ एन ९७४४ हा रोडपाली सिग्नलकडून तळोजा एमआयडीसीकडे येत होता. यावेळी शाईन मोटरसायकल एम एच ४६ सीएस ५१२६ वरील चालक हा जात होता. यावेळी ट्रकने मोटरसायकलला व त्यावरील चालकाला १५ फूट ओढत नेले. त्याला उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे नेण्यात आले. रमेश रंजन यादव याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of my clients I am investigating the right, title and interest of **Mr. Ram Phatumal Kotwani**, residing at Flat No. 9, Sagar Darshan, Ramnath Road, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra in respect of the residential premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the **"said Flat"**).

All person/s having any claim or interest in or to the said Flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:**

ALL THAT 5 (Five) fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive numbers 26 to 30 (both inclusive) bearing Share Certificate No.6 dated 28th September, 2009 issued by "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" and corresponding ownership rights to **Flat No. 9** admeasuring 648 sq. ft. (Built-up area) on the First Floor of the building known as **"Sagar Darshan"** together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

**Dated this 13th day of September, 2024.**

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

## पान १ वरुन

### रोह्यात भीषण स्फोट

असून साधना नायट्रो केमिकल असे कंपनीचे नाव असल्याचे सांगितले जात आहे. या अपघातामुळे मुंबई आणि परिसरातील एमआयडीसीमध्ये विविध कंपन्यांमध्ये झालेल्या स्फोटाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. गेल्या वर्षी एका औषध कंपनीत झालेल्या स्फोटात ७ जण ठार झाले होते. मे २०२३ मध्ये डोंबिवली एमआयडीसीमध्ये अमूदान केमिकल कंपनीत बॉयलरचे लागोपाठ चार-पाच स्फोट झाले होते. यात संपूर्ण कंपनी बेचिराख झाली होती.

गुरुवारी धाटावमध्ये स्फोटाचा आवाज झाल्याने परिसरातील नागरिकांनी कंपनीकडे धाव घेतली. आपले नातेवाईक सुखरुप आहेत का? हे पाहण्यासाठी त्यांनी कंपनीच्या गेट बाहेर गर्दी केली होती. त्यांना सुरुवातीला कोणतीच माहिती मिळाली नाही. ते खुप घाबरुन गेले होते. काही कालावधीनंतर त्यांना घटना समजली.

### गौराईला निरोप

नवनवीन कपडे परिधान करून या मिरवणूकीत महिला, तरुण मंडळी, ज्येष्ठ नागरिक, आदी सर्वचजण आनंदोत्सव साजरा करीत होते. लेझीम, वादनांच्या झंकारात, रंगबेरंगी फटाक्यांची आतषबाजी तसेच एक, दोन,तीन, चार गणपतीचा जयजयकार असा जयघोषण करीत तरुणाईंना जल्लोष साजरा केला.

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...असा ही भावपुर्ण जयघोष करीत सहा दिवसांच्या बाप्पासोबत गौराईला निरोप देण्यात आला. मिरवणूकीच्या दरम्यान पावसाने दडी मारल्याने भाविकांना थोडासा दिलासा मिळाला.

ग्रामीण भागात काही ठिकाणी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नदी, तलावांमध्ये गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. तर काही ठिकाणी रात्री दहा नंतर विसर्जन केले. शहरी भागातदेखील रात्री बारा वाजेपर्यंत मुर्तीचे विसर्जन करून गणरायाला निरोप दिला. जिल्ह्यात ५५ हजार ९२३ गणेशमुर्ती व १५ हजार ८५३ गौराईची मुर्तीचे विसर्जन तलाव, नदी, कृत्रिम तलाव व समुद्रात करण्यात आले. यावेळी भाविकांची विसर्जन स्थळांवर अलोट गर्दी दिसून आली. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला होता. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने दामीनी पथक, बीट मार्शल पथक व साध्या गणवेशातील पोलीस तैनात करण्यात आले होते. अलिबाग शहरामध्ये समुद्रकिनारा, अलिबाग बंदर कोळीवाडा, इंडस्ट्रीअल कॉलेजची मागील बाजू या ठिकाणी गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तीस हून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणूक ठिकठिकाणी करण्यात आली. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी समुद्रकिनारी मुर्तीचे विसर्जन केल्यावर जूना भाजी मार्केटकडून परतीचा मार्ग करण्यात आला होता. नागरिकांच्या सुरक्षेसाठी मदत केंद्र किनारी उभे केले होते. नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

किशोर साळे - पोलीस निरीक्षक
अलिबाग पोलीस ठाणे

### सोनं लपवणारा अटकेत

म्हणून काम करत होता. त्यामुळे त्याच्याजवळ मोठ्या प्रमाणात सोन्याचा बारीक भुसा (सोन्याचा किस) जमा होत होता. हाच सोन्याचा भुसा त्याने मंगळवारी (ता. १०) एका छोट्या प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून ती पिशवी त्याने आपल्या गुदद्वारामध्ये लपवली.त्यानंतर सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास तो काम संपवून घरी जाण्यास निघाला होता, मात्र यावेळी कंपनीच्या बाहेर जाताना लावण्यात आलेला मेटल डिटेक्टर वाजल्याने कंपनीतील सुरक्षा रक्षकांनी राजेशला बाजूला घेत त्याची तपासणी केली, मात्र त्याच्याजवळ काहीच सापडले नाही. त्यामुळे पुन्हा त्याची मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी करण्यात आली.

यावेळीही मेटल डिटेक्टर वाजल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी राजेशची कसून तपासणी केली. त्यानंतर राजेशने आपल्या गुदद्वारामध्ये ३२.३८ ग्रॅम वजनाचा तब्बल दोन लाख १२ हजार ८०० रुपये किमतीचा सोन्याचा भुसा लपवल्याचे आढळून आले. त्यानंतर कंपनीचे व्यवस्थापक सुरेंद्र जाधव यांनी राजेशला तुर्भे एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले.

### 'ला निना' सक्रिय होणार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रशांत महासागरात यंदाच्या वर्षअखेरीस 'ला निना' सक्रिय होण्याची ६० टक्के शक्यता असून, त्यामुळे उत्तर भारतात यंदाचा हिवाळा नेहमीपेक्षा कडक असू शकतो, असा अंदाज आहे. जागतिक हवामान संस्थेच्या दीर्घकालीन अंदाज केंद्राने हा अंदाज वर्तविला आहे. प्रशांत महासागरात सध्या न्यूट्रल स्थिती असून सध्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत या स्थितीत बदल होऊ 'ला निना' विकसित होण्याची ५५ टक्के शक्यता आहे.

त्यानंतर यंदाच्या ऑक्टोबर महिन्यापासून फेब्रुवारी २०२५ पर्यंत त्यात थोडी वाढ होऊन ही टक्केवारी ६० वर पोचू शकते. मॉन्सूनवर विपरीत परिणाम करणारी एल निनोची अवस्था पुन्हा निर्माण होण्याची शक्यता नगण्य आहे.

'ला निना'च्या अवस्थेत मध्य व पूर्व विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाच्या तापमानात मोठ्या प्रमाणात घट होते. त्यामुळे उष्णकटिबंधीय क्षेत्रातील वातावरणातही बदल होतो. ला निना सक्रिय झाल्यानंतर भारतात मॉन्सूनची तीव्रता वाढून पावसाचे प्रमाण वाढते. पाऊस दीर्घकाळपर्यंत पडू शकतो. त्याचप्रमाणे, विशेषत: उत्तर भारतात हिवाळा नेहमीपेक्षा अधिक कडक असतो. मात्र, भारतीय हवामान विभागाने अद्याप त्याची पुष्टी केली नाही.ला निनाचे परिणाम त्याची तीव्रता, कालावधी, सक्रिय होण्याचा वर्षातील काळ आणि हवामानाशी निगडित अन्य घटकांशी परस्परक्रिया आदींवर अवलंबून असतात. सामान्यत: ला निनामुळे हवामानावर एल निनोच्या विरुद्ध परिणाम होतात. एल निनो ही अवस्था ला निनोच्या उलट असून यात प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढते. मात्र, अलीकडच्या काळात मानवी हस्तक्षेपामुळे होणाऱ्या हवामान बदलाची किनारही एल निनो, ला निना विकसित होण्याला आहे. हवामान बदलामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानाच्या टोकाच्या घटना आदींचा सामना करावा लागतो, असे जागतिक हवामान संस्थेने म्हटले आहे.

### महायुतीत चलबिचल

थोरवे यांनी उत्तर देताना काहीच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमीपुजन तसेच काही विकास कामांची मुहूर्तमेढ त्यांच्या हस्ते रोवण्यात आली होती. आमदार थोरवे हे कडवट शिवसेनेचे कार्यकर्ते आहेत. ते नेहमीच आपल्या बिनधास्त स्वभाव आणि वक्यव्यासाठी प्रसिध्द आहेत. एखादी गोष्ट करायची ठरवली की ते तडीस नेतातच असा त्यांच्या समर्थकांना विश्वास आहे. वरीष्ठ नेतेच महायुतीमध्ये भांडणे लावण्याचे काम करत आहेत, असा सूर सध्या राजकीय वर्तुळात उमटत आहे.

मुळात सुरुवातीला या मतदार संघात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशीच सरळ लढत होत असे. माजी आमदार सुरेश लाड यांनी बराच काळ या मतदार संघावर वर्चस्व निर्माण केले होते. पुढे त्यांचे आणि तटकरे यांच्यामध्ये काही कारणांवरुन फाटल्याने त्यांनी पक्षाला रामाराम ठोकत भाजपामध्ये प्रवेश केला होता. सध्या या मतदार संघावर भाजपाचा ही डोळा असल्याची चर्चा आहे. मात्र, जागा वाटपात कोणाला किती आणि कोणत्या जागा मिळणार यावर राजकीय गणित अवलंबून असणार आहे.

### पुण्यावर 'आयबी'ची नजर!

जाणार आहेत. जेणेकरून संबावित घातपाताच्या कारवाई वेळीच रोखता येईल. यासोबतच संवेदनशील भागात गस्त देखील वाढवण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे.

उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये कालिंदी एक्सप्रेसचा अपघात करण्यासाठी ट्रॅकवर गॅस सिलिंडर, पेट्रोलने भरलेली बाटली आणि एका पिशवीत ज्वलनशील पदार्थ आढळून आले. यात घातपाताचा संशय असल्याने राष्ट्रीय तपास संस्थाने (एनआयए) तपास सुरु केला आहे.तर काही दिवसापूर्वी सोलापूर विभागातील कुर्डुवाडी स्थानकाजवळ रेल्वेचा अपघात करण्यासाठी काही व्यक्तींनी रेल्वे ट्रॅकवर सुमारे २३० किलोचे 'स्लीपर' ठेवले होते. सुदैवाने गँगमनने वेळीच हे पाहिल्याने त्याने स्लीपर ट्रॅकवरून हटविले. अन्यथा रेल्वे अपघाताची शक्यता नाकारता आली नसती. अशाच स्वरूपाच्या कारवाया पुण्यातदेखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या पार्श्वभूमीवर मआयबीमने रेल्वे प्रशासनाला काही सूचना दिल्या आहेत.

### मारहाण करणाऱ्या तरुणाला अटक

एक तरुण मारहाण करीत होता. त्याबाबतचा व्हिडीओ ११ सप्टेंबर रोजी व्हायरल झाला होता. संबंधित व्हिडिओची सत्यता तपासून घेत या मारहाणीत जखमी झालेल्या तरुणाचा शोध घेण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी दिले होते. अमोल अरुण बांदल असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे.

त्यानंतर नेरळ पोलिसांनी संबंधित तरुणाचा शोध घेतला. मारहाण झालेला तरुण वडखळ येथील जेएसडब्ल्यू रुग्णालयात उपचार घेत होता. अमोलने नेरळ पोलीस ठाण्यात सायंकाळी साडेसात वाजता तक्रार दाखल केली. त्या व्हायरल व्हिडीओमधील जखमी अमोल हा कर्जत बोरवाडी येथील रहिवासी आहे. त्यानंतर नेरळ पोलिसांच्या पथकाने कल्याण येथून शिवाजी गोविंद सोनावळे तथा शिवा यास ताब्यात घेवुन नेरळ येथे आणले. विशेष म्हणजे अमोल आणि शिवाजी हे दोघे मित्र असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, शिवाजी सोनावळे हा पिंपलोली गावातील रहिवासी असून ३५ वर्षीय शिवाजी उर्फ शिवा हा २०२२ मध्ये झालेल्या कर्जत येथील घटनेतील आरोपी होता. माथेरान शिवसेनेचे शहर प्रमुख प्रसाद सावंत यांची गाडी फोडून मारहाण करण्याच्या हल्ल्यातील शिवा हा दुसरा मुख्य आरोपी होता.

**अलिबाग नगरपरिषद**
**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सूचना सन २०२४-२५**

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये संपूर्ण शहरात डास निर्मूलन फवारणी करणेकामी फेर ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना शासनाच्या https:///www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३-०९-२०२४ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**

### सात लाखांचा गांजा जप्त

ठाण्याच्या हद्दीमध्ये हॉटेल अन्नपुर्णा आहे. त्या परिसरामध्ये एक व्यक्ती ब्रीजा कारमधून गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीसांनी तेथे सापळा लावला असता त्यांना ब्रीजा कार दिसून आली. पोलीस कारच्याजवळ जाताच कारमधील एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला. कारची झडती घेतली असता २५ किलो गांजा सापडला. पोलिसांनी संबंधीत व्यक्तीला ताब्यात घेत अटक केली. पोलीसांनी ब्रीजा कार आणि गांजा असा १५ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक बाळासोहब खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपेश नरे, पोलीस हवालदार प्रतिक सावंत, जितु चव्हाण, अक्षय पाटील, पोलीस शिपाई मोरेश्वर ओमले, बाबासाहेब पिंगळे यांनी केली.

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**ई-लिलाव अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांचे द्वारे खालील वेळापत्रकानुसार ई-निविदा प्रणाली माध्यमाने आयआरईपीएस वर प्रकाशित, व्यावसायिक कराराचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत आहे.

**1) कराराचे नाव:** एसएलआरची लीजींग. **करार/लॉट्स ची सं.:** 10. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 23.09.2024** रोजी **11.00 वा.**

**2) कराराचे नाव:** रोड ओव्हर ब्रिज/रोड अंडर ब्रिज जवळ होर्डिंग्स माध्यमाने जाहिरात (महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक). **करार/लॉट्स ची सं.:** 24. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 23.09.2024** रोजी **11.00 वा.**

**3) कराराचे नाव:** चिपळूण, कणकवली, करमळी, कारवार, बैन्दूर स्टेशन परिसरात वीडियो स्क्रीन्स माध्यमाने व्यावसायिक प्रसिद्धी. **करार/लॉट्स ची सं.:** 5 (20 मालमत्ता). **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 24.09.2024** रोजी **11.00 वा.**

**4) कराराचे नाव:** अस्नोटी, अंकोला, मुर्डेश्वर, बैन्दूर वर पे ॲण्ड पार्किंग करार. **करार/लॉट्स ची सं.:** 05. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 24.09.2024** रोजी **11.00 वा.**

**5) कराराचे नाव:** कोंकण रेल्वे मध्ये कोलाड ते ठोकूर दरम्यान स्टेशनांवर जाहिरात बोर्ड्स, होर्डिंग्स माध्यमाने रेल्वे स्टेशनांवर जाहिरात. **करार/लॉट्स ची सं.:** 21. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 25.09.2024** रोजी **11.00 वा.**

**6) कराराचे नाव:** मडगाव येथे पार्सल स्कॅनर. **करार/लॉट्स ची सं.:** 01. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 25.09.2024** रोजी **11.00 वा.**

**7) कराराचे नाव:** पीएमबीजेके (प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र). **करार/लॉट्स ची सं.:** 1. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 26.09.2024** रोजी **11.00 वा.**

**8) कराराचे नाव:** मडगाव-मंगळुरु-मडगांव (10107/10108) मेमू ट्रेन आणि कोंकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) ट्रेनमध्ये जाहिरातींचे प्रदर्शन. **करार/लॉट्स ची सं.:** 02. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 26.09.2024** रोजी **11.00 वा.**

**9) कराराचे नाव:** चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी येथे डिजिटल डिस्प्ले टिव्ही स्क्रिन. **करार/लॉट्स ची सं.:** 60. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 27.09.2024** रोजी **11.00 वा.**

**9) कराराचे नाव:** कोंकण रेल्वे (कोलाड - मदुरे आणि पेडणे - ठोकूर) वर नॉन केटरिंग आयटमसाठी करार. **करार/लॉट्स ची सं.:** 02. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 27.09.2024** रोजी **11.00 वा.**

**वरील सर्व करारांसाठी प्रकाशनाची तारीख : 13.09.2024**. चौकशीसाठी कृपया संपर्क करा: श्री प्रवीण डावरे, मो. नं. 9004470597 श्री शैलेश सावंत, मो. नं. 9004470596 श्री मधुकुमार शेट्टी, मो. नं. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** भेट द्या.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of my clients I am investigating the right, title and interest of **Ms. Jiya Pradeep Kotwani**, residing at Flat No. 10, Sagar Darshan, Ramnath Road, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra in respect of the residential premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the **"said Flat"**).

All person/s having any claim or interest in or to the said Flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:**

ALL THAT 5 (Five) fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive numbers 31 to 35 (both inclusive) bearing Share Certificate No.7 dated 28th September, 2009 issued by "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" and corresponding ownership rights to **Flat No. 10** admeasuring 598 sq. ft. (Built-up area) on the First Floor of the building known as **"Sagar Darshan"** together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

**Dated this 13th day of September, 2024.**

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर निविदा नोटीस**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म www.panvelcoporation.com या संकेतस्थळावर दि. १३-०९-२०२४ ते दि. २०-०९-२०२४ पर्यंत सायंकाळी १६.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर निविदा घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरीता Ride on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे. | ०६ महिने | रु.१०,०००/- | रु. १,०५०/- (जी.एस.टी.सह) |

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of my clients I am investigating the right, title and interest of **Sunrise Developers** through sole Proprietor **Mr. Rohit Ashok Valecha** having address at 102, Shiv Om Palace, Panjab Colony, Ulhasnagar-3, District Thane, Maharashtra in respect of the residential and commercial premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the **"said Premises"**).

All person/s having any claim or interest in or to the said Premises or any of them or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:**

ALL THAT (1) Shop No. 1 admeasuring 650 sq.ft. (Built-up Area), (2) Shop No. 2 admeasuring 676 sq.ft. (Built-up Area) both on the Ground Floor, and (3) Flat No. 16 admeasuring 845 sq.ft. (Built-up Area) alongwith attached terrace admeasuring 450 sq.ft. on the Third Floor situate in the building known as **"Sagar Darshan"** belonging to "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

**Dated this 13th day of September, 2024.**

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of my clients I am investigating the right, title and interest of **(1) Mr. Pradip Ram @ Ramchand Kotwani**, residing at Sagar Darshan, Ramnath Road, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra and **(2) Mrs. Kajal Deepak Sawlani**, residing at 103, Ashish Palace, Behind BMC, Ulhasnagar, District Thane, Maharashtra in respect of the residential premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the **"said Flat"**).

All person/s having any claim or interest in or to the said Flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO:**

ALL THAT 5 (Five) fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive numbers 21 to 25 (both inclusive) bearing Share Certificate No.5 dated 28th September, 2009 issued by "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" and corresponding ownership rights to **Flat No. 8** admeasuring 585 sq. ft. (Built-up area) on the First Floor of the building known as **"Sagar Darshan"** together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

**Dated this 13th day of September, 2024.**

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

दिनांक :- ११-०९-२०२४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे रुळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक गोपाळ कवळे रा. तळवली, पो. खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली मिळकत माझे अशिल यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत विद्यमान मालकांबरोबर साठेकरार झालेला आहे त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| रुळे | १/२ | | ०-४१-०० | ६.७६ |
| ता.अलिबाग | | पो.ख. | ०-०४-०० | |
| | | एकूण | ०-४५-०० | |

सबब सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी त्यांच्याजवळ असलेले सर्व मालकीहक्का संदर्भात सर्व कागदपत्रे दाखवून खातरजमा करुन दिलेली आहे. या उपरही सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्याबाबत खातरजमा करण्याचे तसेच सदर मिळकतीचे मालकीहक्काबाबत शोध घेण्याचे काम माझ्याकडे दिलेले आहे. तरी संबंधितांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- ११-०९-२०२४

सही/-
**ॲड.एम.एच. वालेकर**
**जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग**

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# पोरकट लोकशाही

अमेरिका भयंकर श्रीमंत आहे. जगातील महासत्ता आहे. त्या देशात कोणीही निरक्षर असण्याची शक्यता नाही. तिथले लोक चोख व्यवहारी आहेत. तरीही त्या देशातील लोकशाही अत्यंत पोरकट आहे. या वर्षअखेरीस तेथे अध्यक्षपदासाठी निवडणूक आहे. त्यासाठी डोनल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस हे दोघे मैदानात आहेत. आपल्याकडे भाजप आणि काँग्रेसचे प्रवक्ते रोज टीव्हीवरून मारामारी करतात. यंदा राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींना थेट लाईव्ह चर्चेचे आव्हान दिले होते. मोदी पत्रकार परिषद घ्यायला घाबरतात. टेलिप्रॉम्प्टर असल्याखेरीज भाषणे करू शकत नाहीत. ते राहुल यांच्यासमोर येणे शक्यच नव्हते. राहुल यांनी अदानी यांच्याबाबत प्रश्न विचारले असते. मोदींची गाळण उडाली असती. सारांश भारतात दुय्यम नेतेच एकमेकांपुढे येतात. अमेरिकेत मात्र अध्यक्षपदाच्या उमेदवारांनी समोरासमोर येऊन वादविवाद करण्याची पद्धत आहे. टीव्हीवरून याचे लाईव्ह प्रसारण केले जाते. ट्रम्प आणि हॅरिस यांच्यातला असा विवाद परवा प्रसारित झाला. त्यात हॅरिस यांनी बाजी मारली असे बहुसंख्य लोकांचे मत झाले. पण या चर्चेचा एकूण दर्जा अत्यंत भिकार होता. पूर्वापार तो तसाच असतो. या चर्चेत देशापुढील प्रश्नांची गंभीर चर्चा कधीच होत नाही. कॉलेजच्या तरुणांनी स्पर्धेत भाग घ्यावा आणि एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करावा तसला हा सर्व प्रकार असतो. लोकही मुद्द्यांकडे फार लक्ष देत नाहीत. कोण जास्त स्मार्ट वाटला, कोणी कशी बाजू उलटवली यावरूनच ते आपापली मते बनवतात. परवाच्या चर्चेतही हेच झाले. हॅरिसबाईंनी ट्रम्प यांच्यावर जोरदार हल्ला केला. ट्रम्प यांच्या सभा बोअर असतात. लोक त्या सभातून उठून निघून जातात वगैरे टीका केली. ट्रम्प यांना ती अनपेक्षित होती. ते गडबडून गेले व असे काही होत नाही असे म्हणू लागले. हॅरिसबाईंचे चाहते व माध्यमे खूष झाली.

### हाणा, मारा, ठोका

अमेरिकेत पूर्वी बॉक्सिंगच्या स्पर्धांची भयंकर क्रेझ होती. एकेकाळी महंमद अली आणि नंतर टायसन हे जगज्जेते होते. सामन्याच्या आधी हे आणि त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्या मुलाखती प्रसिध्द केल्या जात. त्यात हे खेळाडू, मी समोरच्याला कच्चा खाईन, खलास करून टाकीन इत्यादी धमक्या देत. यामुळे त्यांच्या चाहत्यांना चेव येई. ते सामन्यांना मोठी गर्दी करीत आणि प्रत्यक्ष सामन्यांच्या वेळी मारून टाक त्याला असा गजर करीत. आता डब्ल्यूडब्ल्यूएफच्या कुस्त्यांमध्ये हेच चालते. अमेरिकीतील अध्यक्षीय निवडणूक आणि त्यापूर्वी प्रचारादरम्यान उमेदवारांमध्ये होणारे वादविवाद आणि या बॉक्सिंगच्या स्पर्धा यामध्ये काहीही फरक नसतो. वास्तविक, अमेरिकन सरकारच्या धोरणांचा सर्व जगावर परिणाम होत असतो. अमेरिकी डॉलर हेच जगभरात सर्वाधिक मान्य होणारे समाईक चलन आहे. तेथील शेअर बाजारातील वादळे मुंबईसह सर्व जगाच्या शेअर बाजारांवर परिणाम करतात. त्यामुळे अमेरिकेच्या भावी अध्यक्षांची भूमिका काय आहे व भावी धोरणे काय असू शकतील यांचा अंदाज या वादविवादामधून यावा अशी अपेक्षा असते. म्हणूनच त्याची जगभरात चर्चा होते. प्रत्यक्षात दिवसेंदिवस हा सर्वच प्रकार अधिकाधिक पोरकट होत चालला आहे. ट्रम्प हा अत्यंत मूर्ख, उर्मट व बेजबाबदार इसम आहे. एकदा अध्यक्ष होऊन गेलेला असूनही त्याच्या वागण्यात काहीही फरक नाही. पूर्वी अनेक वेश्यांशी त्याचे संबंध होते. ते जाहीर होऊ नयेत म्हणून त्याने बरेच पैसे दिले. त्याच्या भानगडी कोर्टात आहेत. चार वर्षांपूर्वी बायडेन यांच्याविरुध्द ट्रम्प निवडणूक हरला. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्पच्या समर्थकांनी कॅपिटॉल हिल या अमेरिकेच्या सरकारच्या मुख्यालयावर हल्ला केला. या दंगेखोरांना निवडणूक प्रक्रियाच बंद पाडायची होती व त्यांना ट्रम्पची चिथावणी होती. त्याचेही खटले चालूच आहेत. तरीही ट्रम्प हा पुन्हा अध्यक्षीय स्पर्धेत आहे आणि त्याला अमेरिकेतल्या सुमारे ४० टक्के लोकांचा पाठिंबा आहे.

### निव्वळ शो-बाजी

बाहेरून येणाऱ्या स्थलांतरितांचा प्रश्न अमेरिकेत कळीचा झाला आहे. हे स्थलांतरीत स्थानिक अमेरिकी लोकांच्या नोकऱ्या खातात असा प्रचार ट्रम्प करत असतो. साहजिकच कामगार, कष्ट करणारे मजूर यांच्यात तो फार लोकप्रिय झाला आहे. कारण, पाकिस्तान, बांगलादेश, व्हिएतनाम, मेक्सिको इत्यादी ठिकाणहून येणारे अर्धशिक्षित लोक अमेरिकेत अत्यंत कमी पैशात अंगमेहनतीची कोणतीही कामे करायला असतात. त्यामुळे स्थानिक अमेरिकी नागरिकांच्या ऐवजी यांना घेतले जाते. याला रोखण्यासाठी ट्रम्पने मेक्सिकोच्या सीमेवर भिंत बांधली. स्थलांतरितांची पोलिसांकरवी छळवणूक सुरू झाली. आताही ट्रम्प पुन्हा तीच धोरणे राबवायचे म्हणत आहे. खरे तर, अध्यक्ष कोणीही असला तरी अमेरिकी व्यवस्था तीच राहते. अमेरिकेचा स्वार्थ, अमेरिकी कंपन्यांना सर्वत्र मोकाट संधी, अमेरिकीची दादागिरी याबाबत तेथील सर्व पक्षांचे मतैक्य असते. दक्षिण अमेरिकेत कोलंबिया, व्हेनेझुएला, मेक्सिको इत्यादी ठिकाणी कम्युनिस्ट विचारांची सरकारे निवडून आलेली अमेरिकेला चालत नाहीत. क्यूबाच्या फिडेल कॅस्ट्रोला ठार मारण्याचा कट शेकडो वेळा केला गेला. चिलीमध्ये आयेंदेचा खून करण्यात आला. पाकिस्तानात झिया उल हक नावाच्या हुकुमशहाला वाटेल तितका पैसा व शस्त्रे देण्यात आली. अमेरिकी लष्कर आणि बड्या भांडवली कंपन्या त्यांना हव्या त्याच प्रकारचे निर्णय घेतात. अमेरिकेत काही गोष्टींवर ते डेमोक्रॅट्स आणि रिपब्लिकन यांना लुटूपुटीच्या लढाया खेळू देतात. जसे की स्त्रियांना गर्भपाताचा हक्क हवा की नको यावर गेली अनेक वर्षे वाद चालू आहे. वास्तविक तेथील मुलामुलींमध्ये नको त्या वयात भयंकर मुक्त लैंगिक संबंध असतात. तरीही कॅथलिक सनातनी लोकांच्या विरोधामुळे गर्भपात कायदेशीर केला जात नाही. खुलेआम बंदुका वापरायला परवानगी देणे हाही असाच मुद्दा आहे. अमेरिकी लोकांना बंदुका बाळगण्याचा अधिकार हा मूलभूत हक्क वाटतो. यामुळे सतत शाळेत किंवा मॉलमध्ये गोळीबाराच्या घटना घडतात व माणसे मरतात. पण याला विरोध म्हणजे मते गमावणे. त्यामुळे अमेरिकी निवडणुकीतही गंभीर प्रश्नांवर ठोस चर्चा होतच नाही. सगळी निव्वळ शो-बाजी चालते. ट्रम्प-हॅरिस चर्चा त्याचाच नमुना होता.

विचार

# स्वागतार्ह निर्णय

***मुलींच्या लग्नाचे वय २१ वर्षे करण्याचा हिमाचल प्रदेश सरकारने घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे मुलींना आपले शिक्षण पूर्ण करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता येईल. कायद्यामुळे सामाजिक सुधारणेला निश्चितच बळ मिळते. मुलींचे संमतीवय वाढवताना मुलांची मानसिकता बदलणेही आवश्यक आहे. त्यामुळे हिमाचल सरकारचा निर्णय समाज कशा प्रकारे स्वीकारणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.***



**ॲड. केतकी जयकर**

भारतात विवाहसंस्थेला प्रचंड महत्त्व असून मुलामुलींची आणि त्यातही मुलींची लग्न वेळेत व्हायला हवीत, अशी एक मानसिकता किंवा विचारधारा आढळते. महानगरांमध्ये मुलींच्या लग्नाचे वय वाढले असले तरी छोटी शहरे आणि ग्रामीण भागात आजही वयाची अठरा वर्षे पूर्ण होताच किंवा क्वचित प्रसंगी त्याआधीही मुलींची लग्न उरकली जातात. मुलीचे लग्न करून दिल्यानंतर आपण एका मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो, अशीच आई-वडिलांची भावना असते. मुलींच्या लग्नाचे वय हा कायमच चर्चेचा विषय राहिला आहे. मुलीची इच्छा असो वा नसो, मुलगी वयात आली की तिचे लग्न लावून दिले जाते. लग्न ठरवताना प्रत्येक वेळी मुलीच्या पसंतीचा विचार होतोच असेही नाही. प्रसंगी तिला तिची स्वप्ने, इच्छा-आकांक्षांना मुरड घालावी लागते किंवा त्यावर पाणी सोडावे लागते. मुलींच्या, महिलांच्या मताला अनेक घरांमध्ये फारशी किंमतही नसते. त्यातच आज महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असताना हिमाचल प्रदेश विधानसभेने महिलांचे वय १८ वरून २१ करण्याचे विधेयक संमत करून महिला सबलीकरणाच्या दिशेने एक अत्यंत महत्वाचे पाऊल टाकले आहे. आज देशभरात मुलींच्या लग्नाचे कायदेशीर वय अठरा असताना हिमाचल प्रदेश सरकारने घेतलेला हा निर्णय निश्चितच कौतुकास्पद आणि पुरोगामी आहे. हिमाचल प्रदेशसारख्या एका छोट्या राज्याने मुलींच्या लग्नाचे कायदेशीर वय वाढवून पुढारलेल्या म्हणवल्या जाणाऱ्या राज्यांच्या डोळ्यांमध्ये निश्चितच अंजन घातले आहे.

पूर्वीच्या काळी लहान वयामध्ये मुलींची लग्न होत असत. अगदी सहा, सात वर्षांच्या मुलींची लग्न तिशी, चाळीशी उलटलेल्या बीजवराशी करून दिली जात असत. नवरा गेल्यानंतर या लहान मुलींना केशवपन करून संपूर्ण आयुष्य घालवावे लागे. त्यांना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची परवानगी नसे. त्यातच वयाने लहान मुलीला सून करून घेतले तर ती सासरी लवकर रूळते तसेच तिची स्वतंत्र विचार करण्याची क्षमताच विकसित झालेली असते. त्यामुळे सासरचे सांगतील तशीच ती वागते. अशा प्रकारच्या विचारसरणीमुळे मुलींची लग्न कमी वयात होत असत. एखादे चांगले, श्रीमंत स्थळ आले की थांबायचे कशाला, असे म्हणून मुलींची पाठवणी केली जात असे. आजही ही विचारसरणी बऱ्यापैकी टिकून आहे. मुलींचा पगार मुलापेक्षा कमी हवा, तिचे वय नवऱ्यापेक्षा कमी हवे अशा पद्धतीची एक ठाम मानसिकता कायम आहे. मुलीचे शिक्षण आणि पगार भरपूर असेल तर तिचे लग्न कसे होणार, असा प्रश्न विचारणारेही आपल्याच समाजाचा एक भाग आहेत. मुलीचे वय वाढले, ती शिकली तर शिंगं फुटतील, ती आपल्यालाच प्रश्न विचारेल, अरे ला कारे करेल, परंपरा, मर्यादांमध्ये राहणे नाकारेल अशा पद्धतीची एक सुप्त भीती पुरुषांच्याही मनात असते. आपल्याकडची पुरुषप्रधान संस्कृती महिलांच्या प्रगतीसाठी नेहमीच मारक ठरत आली आहे. त्यामुळे हिमाचल प्रदेश सरकारने विधानसभेत बालविवाह सुधारणा विधेयक संमत करून मुलींच्या लग्नाचे किमान वय २१ वर्षांवर नेण्याचा घेतलेला निर्णय कितीही स्तुत्य असला तरी समाज हा निर्णय कशा पद्धतीने स्वीकारणार हा खरा प्रश्न आहे.

अर्थात एखादे विधेयक विधानसभेत संमत करून घेतल्यानंतर त्याचा कायदा केला जातो आणि कायदा हा नागरिकांना बंधनकारक असतो. बालविवाह प्रतिबंध कायद्यात सातत्याने सुधारणा होत गेल्या आणि १९७८ मध्ये मुलींच्या लग्नाचे कायदेशीर वय १८ वर्षे करण्यात आले. म्हणजेच १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीचे लग्न हा कायद्याने गुन्हा मानला जाऊ लागला. मात्र त्यानंतर मुलींच्या लग्नाचे वय वाढवले गेले नाही. मात्र १८ वर्षांची होईपर्यंत तरी आपले लग्न होणार नाही, हा दिलासा तिला मिळाला. सामाजिक सुधारणेला कायद्यामुळे निश्चितच बळ मिळते. बालविवाह करताना कायद्याचा धाक राहतो. आज १८ वर्षांखालच्या मुलींचे विवाह करता येत नाहीत. अर्थात काहीजण कायद्यातल्या पळवाटाही शोधतात. मुलीचे लहान वयात लग्न लावून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सासरी पाठवले जाते. लग्नाचे विधी उरकले जातात. मात्र मुलगी सज्ञान झाल्यानंतरच सासरी जाते. बालविवाह रोखण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. वैयक्तिक पातळीवरही अनेकजण हा सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. अशा पद्धतीने बालविवाह रोखणाऱ्यांना धमकावले गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. मुलींच्या लग्नाचे संमतीवय १८ वर्षे होऊन अनेक वर्षे लोटली असली तरी बालविवाह पूर्णपणे थांबलेले नाहीत, हेही तितकेच खरे. मात्र बालविवाहांना आळा घालण्यात हा कायदा बऱ्याच अंशी यशस्वी ठरला आहे, यात वाद नाही.

मुलींचे लग्नाचे वय वाढवण्याचा निर्णय स्वागतार्ह असण्याचे अजून एक कारण म्हणजे त्यांची शारीरिक वाढ. लहान वयात होणारे लग्न आणि लग्नानंतर लादली गेलेली बाळंतपणे, या बाळंतपणांमध्ये होणारा लहान मुलींचा मृत्यू, शरीरात निर्माण होणारी गुंतागुंत, शारीरिक समस्या हे सगळे फारच भयावह असते. संमतीवय वाढल्याने मुली शारीरिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतील. त्या अधिक निर्णयक्षम होऊ शकतील. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊ शकतील, जोडीदार निवडीबाबतचा निर्णय त्या अगदी विचारपूर्वक घेऊ शकतील. आपले महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. अनेक समाजसुधारकांमुळे राज्यात सामाजिक सुधारणा घडल्या आहेत. सामाजिक सुधारणा घडवण्यात पुरुषांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. महात्मा ज्योतिबा फुले यांनीच आपल्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईंना शिकवले. आनंदीबाई जोशी यांना डॉक्टर करण्यात त्यांच्या पतीचा महत्त्वाचा वाटा होता. आपल्या पत्नीने शिकावे, डॉक्टर व्हावे ही गोपाळराव जोशी यांची इच्छा होती. न्यायमूर्ती महादेव रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे अशी समाजसुधाकांची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या सर्व थोर पुरुषांनी आपल्या पत्नीला प्रोत्साहन दिले. त्यांना पुढे जाण्याची, सार्वजनिक ठिकाणी आपले मत मांडण्याची संधी दिली. त्यातूनच त्या घडल्या आणि महिला सक्षमीकरणाच्या कार्यात आपले योगदान दिले. त्या काळात त्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले, सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागले. मात्र त्या आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या आणि त्याची अत्यंत गोड फळे आज आपण समाज म्हणून चाखत आहोत.

सत्तर, ऐंशी, नव्वदच्या दशकामध्ये महाविद्यालयांमध्ये शिकतानाच मुलींची लग्न होत असत. कॉलेजच्या वर्गांमध्ये मंगळसूत्रे घातलेल्या मुलींची संख्या वाढलेली दिसे. माझे स्वत:चे लग्न मी वकिल झाल्यानंतर वयाच्या पंचविसाव्या वर्षी झाले. माझ्या मुलींची लग्ने त्या अमेरिकेतून शिकून आल्यावर, सॉलिसिटर झाल्यानंतर झाली. त्या वेळी त्या शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम होत्या, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होत्या, योग्य निर्णय घेऊ शकत होत्या. त्याच पद्धतीने सर्वच मुलींना ही संधी मिळायला हवी आणि कायद्याने ती संधी त्यांना नक्कीच मिळू शकते. लग्न, संसार म्हणजे नेमके काय, हे कळण्याएवढे तरी मुलींचे वय असायला हवे. त्याआधीच लग्न करून त्यांचे बालपण हिरावले जाऊ नये. एकवीस हे लग्नाच्या दृष्टीने बऱ्यापैकी योग्य वय आहे. या वयापर्यंत मुली शिक्षण घेऊन स्वत:च्या पायांवर उभ्या राहू शकतात. मुलींनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे खूप आवश्यक आहे आणि लग्नाचे वाढलेले वय त्यांना आर्थिकदृष्ट्या निश्चितच स्वतंत्र करू शकेल. वकिलीच्या व्यवसायात मी अशी अनेक प्रकरणे बघितली आहेत. लहान वयात लग्न झालेली मुलगी सतराव्या वर्षी तीन मुलांची आई होते आणि पतीच्या निधनानंतर सतराव्या वर्षी विधवा होते, रस्त्यावर येते. अनेक महिला लैंगिक अत्याचारालाही बळी पडतात. या सगळ्याचा विचार करता मुलींच्या लग्नाचे संमतीवय वाढणे ही मोठी गोष्ट आहे. मात्र यासोबतच अशा पद्धतीचे निर्णय स्वीकारण्याच्या दृष्टीने मुलांची, पुरुषांची मानसिकताही बदलली पाहिजे, त्यांचे समुपदेशनही व्हायला हवे.

असे झाले तरच परिस्थिती बदलायला मदत होईल. हिमाचल प्रदेशच्या पावलावर पाऊल टाकत अन्य राज्यांनीही अशा प्रकारच्या कायद्याबाबत विचार करायला हवा.

आजकाल

# पुरामध्ये ३६ तास झाडाला लटकून राहिला, पण वाचला

**वर्षा कोडापे**

गडचिरोली जिल्ह्याच्या भामरागड तालुक्यातील लाहेरी पलीकडील बहुतांश गावे पावसाळ्यात संपर्क क्षेत्राच्या बाहेर असतात. मागील काही दिवसापासून या भागात पुन्हा मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थिती आहे. या भागातील आदिवासी लाकडी बोटीच्या सहाय्यानेच ये-जा करतात. अशातच गुंडेनूर येथील दलसु अडवे पोदाडी हा लाकडी बोटीने नाला ओलांडत असतांना पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. परंतू, तब्बल दोन रात्र एक दिवस असा ३६ तास झाडावर अडकून असलेल्या दलसुला गावकऱ्यांनी रेस्क्यू करत त्याचे प्राण कसे वाचवले याबाबतीत घेतलेला हा आढावा..

गडचिरोली जिल्ह्यात अंगावर शहारे आणणारी बातमी नुकतीच समोर आली आहे. भामरागड तालुक्यातील दोघेजण रविवारी (८ सप्टेंबर) रोजी बोटीच्या साहाय्याने गुंडेनुर नाला ओलांडताना पाण्याच्या प्रवाहात बोट उलटली. तुडुंब भरलेल्या नाल्यातून एकजण कसाबसा बाहेर पडला तर दुसरा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. गावकऱ्यांनी अशाच सोडली. दोन दिवसांनतर गावकरी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या इसमाचा मृतदेह शोधण्यासाठी गेले. दरम्यान गावकरी दिसताच त्या इसमाचा आवाज गावकऱ्यांच्या कानावर आला.

सदर इसम तुडुंब भरलेल्या नाल्याच्या मधोमध झाडावर अडकून होता.गावकऱ्यांना पाहून त्याने जोराचा आवाज देताच गावकऱ्यांनी धाव घेत रेस्क्यु करत बाहेर काढले. दलसु अडवे पोदाडी असे त्या पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या इसमाचे नाव. तब्बल दोन रात्र एक दिवस असा ३६ तास तो झाडावर अडकून होता. अखेर गावकऱ्यांना 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय आला. संपूर्ण गाव एकत्र येत झाडांना दोरी बांधून दलसु पुरातून बाहेर काढले आणि जीव वाचवला.

भामरागड तालुक्यातील लाहेरी पलिकडील बहुतांश गावे पावसाळ्यात संपर्क क्षेत्राच्या बाहेर असतात. मागील काही दिवसापासून या भागात पुन्हा मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थिती आहे. लाहेरी वरून ४ किलोमीटर अंतरावर गुंडेनुर गाव आहे. लाहेरी आणि गुंडेनूर या दोन गावांच्या मधोमध एक मोठा नाला वाहतो. सदर नाला मोठा असून पावसाळ्यात या नाल्याला नदीचं स्वरूप येतं. या भागातील आदिवासींना शेतीसाठी खते, जीवनावश्यक वस्तू, आठवडी बाजार तसेच विविध कार्यालयीन कामासाठी लाहेरी आल्याशिवाय पर्याय नाही. लाहेरी वरूनच पुढील प्रवास सुरु होतो.

दरवर्षी पावसाळ्यात या नाल्यातुन बोटीच्या साहाय्याने किंवा कंबरभर पाण्यातून जलप्रवास करताना अनेकांचे जीव गेले आहे. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन प्रशासनाने या नाल्यावर पुलाचे बांधकाम सुरू केले. मात्र पावसाळा असल्याने बांधकाम थांबले आहे. त्यामुळे या भागातील आदिवासी लाकडी बोटीच्या सहाय्यानेच ये-जा करतात. रविवारी लाहेरी येथील आठवडी बाजार करून सायंकाळच्या सुमारास गुंडेनूर येथील विलास पुंगाटी आणि दलसु पोदाडी हे दोघे आपल्या गावाकडे जाण्यासाठी लाकडी बोटीने गुंडेनुर नाला ओलांडत होते.

अचानक पाण्याचा प्रवाह वाढला अन बोट तुडुंब भरलेल्या नाल्यात उलटली. त्यातील विलास पुंगाटी हा पाण्याच्या प्रवाहातून पोहत पोहत बाहेर पडला. मात्र, दलसु अडवे पोदाडी हा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला.

विलासने आपला गुंडेनुर गाव गाठल्यावर दुसऱ्या दिवशी म्हणजे ९ सप्टेंबर रोजी गावातील लोकांना घडलेली घटना सांगितली. रविवार पासून या भागात प्रचंड पाऊस आहे. नदी-नाले तुडुंब भरून वाहत असल्याने दलसू अडवे पोदाडी याचा जीव गेला असणार असे गावकऱ्यांना वाटले. मंगळवारी पावसाने विश्रांती घेताच गावकऱ्यांनी सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्याचा मृतदेह शोधायला बाहेर पडले. गुंडेनूर नाल्याजवळ शोधमोहीम राबवित असताना तुडुंब भरलेल्या नाल्याच्या मधोमध एका झाडावरून जोराचा आवाज येतो. तेंव्हा दलसू हा जिवंत असल्याचे गावकऱ्यांना कळताच त्यातील काही नागरिकांनी परत गाव गाठून बचाव साहित्य आणले. तुडुंब भरलेल्या नाल्यातून तब्बल दीड ते दोन तास रेस्क्यू करत गावकऱ्यांनी त्याला बाहेर काढले.

**कसे गेले ते ३६ तास?**

दलसू पुराच्या पानात वाहून गेल्यानंतर तो एका झाडाला लटकला. त्यात झाडाचा आधार घेत तो तिथेच झाडावर राहिला. विशेष म्हणजे रविवार पूर्ण रात्र, सोमवार दिवस आणि रात्र असे तब्बल ३६ तास किर्र जंगलातील तुडुंब भरलेल्या नाल्यात दलसू न जेवता, न पाणी पिता झाडावर जिवंत होता. अजूनही या भागात मुसळधार पाऊस सुरूच आहे. दलसूला तुडुंब भरलेल्या नाल्यातून बाहेर काढताना गावकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. त्याला वाचविण्यासाठी अख्खं गाव पाण्यात उतरले होते. मात्र दलसूने हिंमत न हरता हा प्रसंग पार केल्याने गावकरी आनंद व्यक्त करत आहेत.

या भागातील आदिवासींना सदर नाला पार करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या नाल्यात या भागातील अनेक नागरिकांचे जीव गेले आहे. दरवर्षी दिवाळी नंतर पाण्याचा प्रवाह कमी होताच या भागातील आदिवासी बांधव श्रमदानातून बांबूच्या ताटव्यांचा पूल तयार करून ये-जा करतात. मागील काही वर्षांपूर्वी दलसूचे वडील अडवे देखील याच नाल्याच्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. मात्र मुलगा या संकटातून बाहेर पडला आहे.

**बाईमाणूसवरुन साभार**

लोकसंसद

## आता ज्येष्ठ नागरिकांची रेल्वे सवलत पूर्ववत करा

देशातील ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता आयुष्यमान भारत या योजनेतंर्गत ५ लाखांचा आरोग्य विमा मिळणार असून ५ लाखांपर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत मिळणार आहेत. या आरोग्य योजनेचा लाभ देशातील ७० वर्षांवरील सुमारे ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना होणार आहे. या अनुषंगाने केंद्र सरकारने नुकताच निर्णय घेतला आहे. त्याबद्धल सरकारचे शतशः आभार. आता केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे तिकिटांमध्ये देण्यात येणारी आणि कोरोना काळात २० मार्च २०२० पासून पूर्णपणे बंद करण्यात आलेली सवलत पुन्हा लागू करावी. खरे तर कोरोनाचा बहर ओसरल्यानंतर भारतीय रेल्वे पूर्ण क्षमतेने रुळावर आली आणि कोरोनापूर्व काळातील भारतीय रेल्वेकडून रेल्वे तिकीटांवर ज्येष्ठ नागरिक वगळता विविध वर्गवारीतील नागरिकांना ज्या विशेष सवलती दिल्या जात होत्या त्या पूर्ववत करण्यात आल्या. एकीकडे लोकप्रतिनिधींच्या विविध सुविधा आणि सवलतींमध्ये वाढ होत असताना ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली रेल्वे तिकिटांवरची सवलत बंद केल्यामुळे देशभरातील ज्येष्ठ नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१३ सप्टेंबर**

**१८८५ :** इतिहास संशोधक, लेखक चिंतामणराव उर्फ अप्पासाहेब सांगलीकर यांचा जन्म. **१८९३ :** प्रार्थना समाजाचे एक संस्थापक, समाजसुधारक लेखक मामा (नारायण महादेव) परमानंद यांचे निधन. पितृबोध (तरूणास उपदेश) हे त्यांचे पुस्तक गाजले. **१९०७ :** शिक्षणविषयक पुस्तकांचे लेखक लक्ष्मण नीळकंठ छापेकर यांचे निधन. सानेगुरूजींवरील 'स्मृतीगंध' हे पुस्तक (यात गुरूजींची मुलाखतही आहे), 'शिक्षण आणि जीवन', 'जीवनविकास', 'अभिनव संस्कार' आदी पुस्तके त्यांनी लिहिली. **१९२६ :** विनोदी व ललित लेखक, बालसाहित्यिक वसंत श्रीपाद निगवेकर यांचा जन्म. 'अंजूच्या गोष्टी भाग १, २', 'सगळम् खोटम् खोटम्' या बालसाहित्यासह 'कारागिरकराशी पडली गाठ' हा विनोदी कथासंग्रह प्रसिद्ध. **१९३० :** लेखक, तत्वज्ञानाचे अभ्यासक, प्रा.डॉ. श्रीनिवास रघुनाथ कावळे यांचा जन्म. ह्यांचे 'डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे : व्यक्तिदर्शन आणि साहित्य विवेचन' व 'समर्थ दर्शन' हे सहकार्याने केलेल्या संपादनाशिवाय, 'सुगम आकरिक तर्कशास्त्र', 'सुगम तर्कशास्त्र आणि वैज्ञानिक पद्धती', 'सुगम तर्कशास्त्र प्रवेश', 'सुगम सामाजिक मानसशास्त्र' आदी पाठ्यपुस्तकांचे ते सहलेखक आहेत. **१९३२ :** हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात काही स्त्रियांनी मानाचे स्थान प्राप्त केले. त्यापैकी एक, गानप्रभा 'प्रभा अत्रे' यांचा जन्म. देशपरदेशातून संगीताच्या मैफिली गाजवणाऱ्या प्रभा अत्रे यांनी लेखनही केले. आपल्या पी.एच.डी. च्या प्रबंधातून संगीताचे ज्ञान हे चहूबाजूने विस्तारायला हवे असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. तसेच संगीताचे शास्त्रोक्त ज्ञान प्रत्येक गायकास आवश्यक आहे असे त्या आवर्जून सांगतात. एसएनडीटी विद्यापीठात संगीत विभागाच्या प्रमुखपदी असताना विद्यार्थ्यांसाठी त्यांनी संगीत या विषयावर 'स्वरमयी', 'स्वराली' आणि 'स्वरांगिनी' ही पुस्तके लिहिली. तसेच त्यांनी स्वतः लिहिलेल्या काव्याचे 'अंतः स्वर' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. शंकराचार्यांनी त्यांना 'गानप्रभा' ही उपाधी देऊन गौरविले आहे. **१९३४ :** लेखक दिनकर बोरीकर यांचा जन्म. 'मौलाना आझादांच्या चरित्रासह पुस्तकांच्या जगात', 'फैसला', 'रंग तुझा कोणता?', 'नांदा सौख्यभरे', 'गब्बर सिंह आणि इतर धमाल' या पुस्तकासह 'रविवारच्या शोधात', 'पालकत्वा ची गुपिते', 'जगाव तर असंच' ह्या बालएकांकिका प्रसिद्ध. **१९३९ :** लेखक जयवंतकुमार गणेश दीक्षित यांचा जन्म. 'जुगारी' ही त्यांची कादंबरी रशियन लेखक दोस्तोव्हस्की यांच्या कादंबरीचा अनुवाद आहे. **१९४० :** लेखक मोहन विनायकराव काळीकर यांचा जन्म. 'प्रेमस्वरूप' हा कथासंग्रह. 'अलिकडे पलिकडे' हे प्रवासवर्णनपर पुस्तक प्रसिद्ध. **१९४५ :** 'व्यवस्थापन' या विषयावर लेखन करणारे शरदचंद्र लक्ष्मण जोशी यांचा जन्म. 'मंतरलेले व्यवस्थापन' हा लेखसंग्रह आणि 'व्यवस्थापन मित्र' हा व्यवस्थापन विषयक प्रश्नासंबंधीचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९५६ :** विविध नियतकालिकांतून लेखन करणारे डॉ. रमेश वामन आवलगावकर यांचा जन्म. प्राचीन समीक्षणात्मक साहित्याची आवड असणाऱ्या आवलगावकर यांचा 'केशिराज व्यास : व्यक्ती आणि वाङ्मय' या ग्रंथातून महानुभाव पंथातील केशिराज व्यास यांचे चरित्र आणि त्यांच्या साहित्याची समीक्षा केली आहे. १९६२ : कथा, काव्य, कादंबरी, ललित अशा स्वरूपाचे लेखन करणाऱ्या लेखिका सुजाता शिरवळकर महाजन यांचा जन्म. 'आर्त', 'भावनिका' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९७३ :** छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सरंजामशाहीच्या विरोधी असून ती शेतकरी क्रांती होती, असे प्रतिपादन करणाऱ्या 'धर्म आणि क्रांती' या पुस्तकांसह महत्त्वाच्या राजकीय इतिहासपर पुस्तकांचे लेखन लालजी मोरेश्वर पेंडसे यांचे निधन. 'महाराष्ट्राचे महामंथन' हा संयुक्त महाराष्ट्र लढ्यांचा इतिहास', 'नवमतबाद', 'रशियाचा प्रभातकाळ' (महर्षी अरविंद बाबू यांच्या पुस्तकाचा अनुवाद), 'साहित्य आणि समाजजीवन', 'गिरणी कामगारांचा एक तेजाचा लढा', 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद', 'मध्यरात्रीचे सूर्यदर्शन' आदी पुस्तके त्यांनी लिहिली होती. **१९७५ :** 'दुर्ग' या विषयावर तळमळीने आणि वास्तवाला धरून लेखन करणारे लेखक भगवान चित्रे यांचा जन्म. 'गडकोट' या पुस्तकातून सह्याद्रीच्या रांगेतील ५१ किल्ल्याची महती, कोल्हापूर जिल्ह्यातील १३ किल्ल्यांचा इतिहास 'दुर्गवैभव कोल्हापूर जिल्ह्याचे' या पुस्तकांतून घेतला.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ सप्टेंबर

१) श्री.पुरुषोत्तम गोविंद पाटील
वरसोली, अलिबाग
१३-०९-१९२९

२) श्री. कमळाकर लक्ष्मण पाटील
झिराड, ता. अलिबाग
१३-०९-१९४२

३) श्रीम. शैला सुहास सबनीस
अलिबाग
१३-०९-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# पनवेलचा विकास ही काळाची गरज

## शेकापचे शहराध्यक्ष अमोल शितोळेंचे प्रतिपादन; प्रारूप विकास योजनेसाठी दिल्या हरकतीवजा सूचना

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल पालिकेने पनवेल महानगर क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा जाहीर केला आहे. त्याबद्दल नागरिक, सामाजिक संस्था, राजकीय पक्षाकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा योग्य अभ्यास करून ऊहापोह केला आहे. पनवेलचा विकास ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादनही श्री. शितोळे यांनी केले.

पालिकेला केलेल्या सूचनात त्यांनी सेक्टर ३४,३५ व ३६ ला विस्तीर्ण खाडी किनारा लाभला आहे. मात्र, कांदळवन आणि इमारतींच्या संरक्षण भिंती यांच्यात सिडकोच्या आराखड्यात सर्विस रस्ता आहे. मात्र, प्रत्यक्ष समुद्राच्या भरतीचे पाणी इमारतींच्या संरक्षण भिंतींना लागत आहे. तिथे सिडकोच्या आराखड्याप्रमाणे रस्ता करण्यात यावा तसेच वाशी नवी मुंबईच्या आधारावर मिनी सी-शोरसारखे उद्यान विकसित करावे. सेक्टर ४१ प्लॉट-१ येथे कामोठे शहरात प्रवेश करताना रिकाम्या प्लॉटवर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा अथवा स्मारक उभे करावे. जवाहर इंडस्ट्रीलगत असलेला रिकामा प्लॉट मैदान म्हणून घोषित करावा, मैदान तयार करण्यासाठी नागरिक, तरुणांनी स्वखर्चाने निधी उभारून कामे केलीत, पालिकेने तिथे अपंग शाळेचे आरक्षण टाकले आहे. पण, कामोठेमध्ये एकही मैदान नाही, त्यामुळे शाळेसाठी

> पनवेल महापलिकेने फक्त कराचे उत्पन्न मिळवण्यासाठी नवी मुंबईबरोबर तुलना केली आहे. ज्याप्रमाणे नवी मुंबईमध्ये सुविधा, उद्याने-मैदाने आहेत, तसे कामोठे-पनवेलमध्येदेखील देण्यात यावे, हीच माफक अपेक्षा आहे.
>
> – अमोल शितोळे, कामोठे शहर अध्यक्ष, शेतकरी कामगार पक्ष

दुसरा भूखंड देण्यात यावा. सर्वच मुलांना वेंगसरकर अकादमीमध्ये जाऊन क्रिकेट खेळणे शक्य नाही, असेदेखील सुचवले आहे. आदिवासी पाडा (सेक्टर-१) ते सेक्टर २१ (विस्टा




कॉर्नर) लगतचा नाल्यातील गाळ आजतागायत काढण्यात आला नाही, तसेच नाला बंदीस्त नसल्याने तिथे दुर्गंधी येते. पूर्वी तिथे ओढा होता, त्यात पावसाचे पाणी वाहून जात.

मात्र, आजूबाजूच्या जागेचा विकास झाल्याने ओढ्याचे रूपांतर नाल्यात झाले. भविष्यात ज्याप्रमाणे मुंबईला आज मिठी नदीच्या पुराचा धोका आहे, तसा कामोठेलादेखील आहे. त्यामुळे नाल्याचा गाळ काढून त्याला रुंद व खोल करणे तसेच नाल्याच्या आजूबाजूला विविध वनस्पती लावून परिसर सुशोभित करणे अधिक सोयीचे होईल. १०-१५ वर्षांपूर्वी खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ मोठ्या पाणथळ जमिनी होत्या. मात्र, पंतप्रधान आवास योजना आल्याने बऱ्याच जमिनींमध्ये भराव टाकून इमारती निर्माण केल्या आहेत. खाडीकिनारी शिल्लक असलेल्या पाणथळ जागेवर दुर्मिळ तसेच परदेशी पक्षी येतात. पक्ष्यांचा अधिवास टिकून ठेवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी नवी मुंबई पालिकेने पामबीच-सिवूड येथेच्या प्रमाणे पाणथळ जागा जपून विकास केला आहे, त्या आधारावर खांदेश्वर स्टेशन परिसराचा विकास करावा. सदर सूचना करण्यास मा. नगरसेवक प्रमोद भगत, सामाजिक कार्यकर्त्या रंजना सलोडीकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# सारनाथ बुद्ध विहारातील कार्यक्रम उत्साहात

**। अलिबाग । वार्ताहर ।**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया रायगड जिल्हा अंतर्गत तालुका शाखा कर्जत व कर्जत तालुक्यातील सर्व विभाग शाखांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील सारनाथ बुद्ध विहार कशेळे येथे रविवारी (दि. ८) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत कशेळे येथील राहुल युवक मंडळ व यशोधरा महिला मंडळ यांच्या व्यवस्थापनांतर्गत दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया कर्जत तालुका अध्यक्ष आयु किसन रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख



मार्गदर्शक म्हणून आद. महेंद्र मोरे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य कोषाध्यक्ष स.जा. कवडे, महाराष्ट्र राज्य संस्कार सचिव के.के. गाडे, रायगड जिल्हाध्यक्ष संजय जाधव, माजी अध्यक्ष काशिनाथ कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष वसंत कांबळे, उद्योजक सुरेश सोनावणे, सेवानिवृत्त फॉरेस्ट ऑफीसर बी.डी. गायकवाड, संजय जाधव, रायगड जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, कर्जत तालुका कार्यकारिणी, आजी-माजी कार्यकर्ते, माजी श्रामणेर बौद्धाचार्य, कार्यकर्ते, सर्वविभागाचे अध्यक्ष, दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक तसेच राहुल युवक मंडळाचे सर्व पदाधिकारी, यशोधरा महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी, तालुक्यातील तमाम धम्म बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आत्माराम खंडागळे यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र गायकवाड संस्कार सचिव रायगड जिल्हा व कर्जत तालुका महासचिव रमेश गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व नियंत्रण कोषाध्यक्ष दिपक जाधव तालुका पदाधिकारी यांनी पाहिले.

# रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

भगवान आदिनाथ दिंगबर जैन प्रतिष्ठान बदलापूर यांच्यावतीने रविवारी (दि. ८) कात्रप बदलापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

'जगा आणि जगू द्या' या प्रतिष्ठानच्या ब्रीद वाक्यानुसार 'रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. शहरातील विविध रुग्णालयांमध्ये रक्तपेढ्यांना रक्तसाठा कमी पडू लागला आहे. तरुणाईमध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजविणे आणि त्यांना रक्तदानासाठी प्रेरित करण्याच्या



अनुषंगाने आदिनाथ दिगंबर जैन प्रतिष्ठान बदलापूर यांच्यातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान ही आजच्या काळाची गरज आहे. बऱ्याच रुग्णांना वेळेवर रक्त न मिळाल्यामुळे आपले प्राण गमवावे लागते. त्यामुळे तरुणाईने अधिकाधिक रक्तदान करण्याचे आवाहन केले. शिबिरात जवळपास ४० रक्तदात्यानी रक्तदान केले. सामान्य जनतेस हा मदतीचा हात मिळावा, या अनुषंगाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी चिदानंद चॅरिटेबल ब्लड बँकेचे सहकार्य मिळाले. यावेळी दिगंबर जैन प्रतिष्ठानचे प्रीतम शहा, महावीर दरुरे, योगेश ठोले, नवीन हेमावत, चंचलकुमार पंचोरी यांच्यासह जैन बांधव उपस्थित होते.

# खारपाडा शाळा तालुक्यात प्रथम

**। खरोशी । वार्ताहर ।**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. २ मध्ये केंद्रस्तरीय, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय मूल्यांकनात रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खारपाडा पेण तालुक्यातून अव्वल ठरली असून, शाळेने प्रथम क्रमाकांचे बक्षीस मिळवले आहे. खारपाडा शाळा नेहमीच नवनवीन उपक्रम राबवून शाळेतील विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करीत आली आहे. सन २०२३/२४ या वर्षात इयत्ता पाचवी या वर्गातून शिष्यवृती स्पर्धेत ग्रामीण भागातून तालुक्यातून प्रथम शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी याच शाळेचा असून, नवोदय विद्यालय परीक्षेत ग्रामीण भागातून एका विद्यार्थ्याची निवड झाली आहे. शाळेत स्वतंत्र प्रयोगशाळा व वाचनालय आहे. आतापर्यंत शाळेने ५० ते ६० लाखांपर्यंत कंपनी सीएसआर फंडातून काम केले असून, शाळेची नवीन इमारत उभी केली आहे. शाळेत प्रोजेक्टर, व्हिव्ह बोर्ड वेब कॅमेरे, वायफाय सुविधा, विद्यार्थ्यांसाठी जीम पार्क इत्यादी सुविधा असून, शाळेत नेहमी विविध व्याख्याने, सर्पमित्र, बँकिंग व्यवस्था, किशोरवयीन मुलामुलींसाठी मार्गदर्शन, मुलींसाठी कराटे, गडकिल्ल्यांविषयी मार्गदर्शन व सहलींचे आयोजन केले जाते.

# बाजारात केळीच्या पानांना कर्दळीच्या पानांचा पर्याय

### ■ गणेशभक्तांकडून खरेदीसाठी गर्दी

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवामध्ये ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये या सणाच्या दिवशी केळीच्या पानामध्ये पंचपक्वान्न खाल्ले जाते. परंतु, केळीचे पान दुर्मिळ असून, शिवाय ती महाग विकली जातात. त्यामुळे त्याला पर्याय म्हणून पावसाळ्यात डोंगराच्या कुशीत केळीसारखी दिसणारी कर्दळीच्या पानांचा पर्याय म्हणून खोपोली, चौक, मोहपाडा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्रीस येत आहेत.

कर्दळीचे पान हे थंड असल्यामुळे अन्न पचनास सोपे जात असते. गणपती घरी असल्यामुळे आपले नातेवाईक, मित्रमंडळी बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. शिवाय,



उत्सव म्हटले की प्रत्येकाची लगबग असते. अशा वेळी हे कर्दळीचे पान महिलांना पर्वणी वाटते. त्यामुळे सध्या कर्दळीच्या पानांना बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

# रेवदंड्यातील वाहतूक कोंडीने जनता हैराण

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा बाजारपेठेत बेशिस्तपणे रस्त्याच्या दुतर्फा लहान-मोठी वाहने उभी करण्यात येत असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील नागरिक व रेवदंडा पंचक्रोशीतील लोक खरेदीसाठी येत असतात. बाजारपेठेतील अरूंद रस्त्यात मोटारसायकल, रिक्षा, मालवाहतूक टेम्पो, तसेच लहान-मोठी वाहने बेशिस्तपणे पार्किंग केली जातात, त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा-ये करणाऱ्या मोठ्या बसेस, मालवाहतूक ट्रक यांना अडथळा निर्माण



होतो, त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याने होते. मुख्य रस्ता अरूंद असल्याने पार्किंग समस्यासुद्धा निश्चितच जाणवते. बाजारपेठेतील अरूंद रस्त्यात पार्किंग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कूलदरम्यान नित्याने वाहतूक कोंडीची समस्या असते. विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका ते पुढे रेवदंडा हायस्कूलपर्यंत नित्याची वाहतूक कोंडी निर्माण होत असते. बाजारपेठेतील नित्याने होत असलेली वाहतूक कोंडी पोलिसांनासुद्धा डोकेदुखी ठरत आहे.

## ट्रकचालकाला मारहाण करून रोखड लुटली

**पनवेल :** पळस्पे हायवे २०० मीटरच्या पुढे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या पुणे लेनच्या ९.८ कि.मी. अंतरावर एका ट्रक चालकाला जबरी मारहाण करून त्याच्या खिशातील रोख रक्कम व मोबाईल फोन असा मिळून जवळपास ३३ हजारांचा ऐवज चार अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. गेंदलाल पटेल (३५, रा. मध्य प्रदेश) हे त्यांच्या ताब्यातील ट्रक पनवेलवरुन पुणे असा माल भरुन घेऊन जात असताना ट्रक थांबवून ते लघुशंकेसाठी खाली उतरले. यावेळी चार अज्ञात इसमांनी तेथे येऊन त्यांना हाताबुक्क्यांनी मारुन जखमी केले. तसेच त्यांच्या खिशातील व ट्रकच्या सीटमधील दोन मोबाईल फोन व २३ हजार रुपये रोख असा एकूण ३३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेला.

# तळोजाची औद्योगिक स्मार्ट सिटीकडे वाटचाल

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमध्ये ८३ हजार कोटी रुपयांचा सेमीकंडक्टर प्रकल्प येणार असल्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. तसेच तळोजा औद्योगिक वसाहतीलासुद्धा स्मार्ट सिटीचा दर्जा मिळणार असल्याने येथील उद्योजकांनी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांच्या कार्यपद्धतीविषयी समाधान व्यक्त केले आहे. मागील अनेक वर्षांपासून येथील उद्योजकांकडून सुविधा पुरविण्याची मागणी सातत्याने केली जात होती.

राज्यातील सर्वात प्रगत औद्योगिक वसाहतीमध्ये तळोजाचा समावेश होतो. तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने (टीआयए) या परिसराला सुविधांसाठी वारंवार सरकारकडे पाठपुरावा केल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. स्मार्ट औद्योगिक वसाहतीमुळे तळोजा औद्योगिक क्षेत्रात तळोजा उपविभाग कार्यालय, स्मार्ट सेवा ऑपरेशन एमआयडीसीचे मुख्य कार्यालय आणि नियंत्रण कमांड सेंटर ऑपरेट आणि व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक कमांड आणि नियंत्रण कक्षाची स्थापना होणार आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उद्योग विभाग उभारणार आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबरोबरच हवेतील प्रदूषणाचा गुणवत्ता दर्जा नियंत्रणाची यंत्रणा येथे उभारली जाईल. स्मार्ट पथदिवे, डिजिटल होर्डिंग, आपत्ती यंत्रणेंतर्गत इमर्जन्सी कॉल बॉक्स आणि पब्लिक ॲड्रेस सिस्टीमसह स्मार्ट पोल यांसारख्या स्मार्ट घटकांची अंमलबजावणी उद्योग विभाग करणार आहे. अद्ययावत यंत्रणेमधील सामूहिक माहिती संकलनाद्वारे स्मार्ट पाण्याचे मोजमाप केले जाणार आहे.

सामायिक रासायनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी) फेज १ आणि २ तसेच पंपिंग स्थानकाच्या आत येणार्या व प्रक्रियेनंतर बाहेर पडणार्या वाहिनीवर प्रवाही गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली आणि प्रवाह मापनाचे मोजमाप करणारी यंत्रणा बसविली जाणार आहे. याच प्रकल्पामध्ये तळोजा औद्योगिक क्षेत्रात वापर होत असलेल्या आणि मंजूर पाणी वापराबाबत सर्वेक्षण केले जाईल. अशाच पद्धतीने उद्योजकांकडून वापर होत असलेल्या ऊर्जा विभागाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. भौगोलिक माहिती प्रणाली ड्रोन कॅमेर्यावर आधारित थ्रीडी बेसने मोजमाप केले जाणार असल्याची माहिती टीआयएच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## ॲड. संजय टेंबेंची अध्यक्षपदी निवड

**रसायनी :** खालापूर तालुका युवा वकील संघटनेच्या अध्यक्षपदी युवा वकील संजय टेंबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. खालापूर तालुका युवा संघटनेची सर्वसाधारण सभा खालापूर न्यायालयातील वकिलांच्या बार रूम येथे पार पडली. सभेत त्यांच्या नावाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. युवा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सचिन चाळके यांचा कार्यकाळ संपल्यामुळे ही सर्वसाधारण बैठक झाली. यावेळी सचिन चाळके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष ॲड. विकास म्हात्रे, ॲड. राजीव आपटे, ॲड. धनंजय शेटे, ॲड. उमेश पवार, आदी मान्यवर उपस्थित होते.

# जहांगीर आर्ट गॅलरी येथे चित्रांचे प्रदर्शन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील चित्रकार जितेंद्र (जितु) गायकवाड यांच्या चित्रांचे प्रदर्शन दि. ९ ते १५ सप्टेंबरपर्यंत जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे भरवण्यात आले आहे. तरी या प्रदर्शनाला जास्तीत जास्त पेणसह रायगडकरांनी भेट देण्याचे आवाहन चित्रकार जितु गायकवाड याने 'कृषीवल'शी बोलताना केले.

त्यांनी सांगितले की, आज जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये चित्रांचे प्रदर्शन करताना अनेक समस्यांना तोंड द्यावा लागतो. परंतु,



माझ्या चाहत्यांच्या पाठबळावर मी हा कलेचा धनुष्य उचलत आहे. या अगोदरही जहांगीर आर्ट गॅलरी येथे चित्रांचे प्रदर्शन मी लावले असून, अनेक कलारसिकांनी त्याला भेट देऊन मला भरभरून सहकार्य केले. यावेळीदेखील आपल्या मातीतील कलाकाराच्या कलेला भेट देऊन सहकार्य करावे.

# मोकाट गुरांमुळे अपघात वाढले

### ■ रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीत भर

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यात मोकाट गुरे ही वाहनचालकांची मोठी समस्या निर्माण झाली आहे.ही मोकाट गुरे सरळ रस्त्याच्या मधोमध बसण्याचा मार्ग अवलंबतात. परिणामी, वाहतुकीची कोंडीची समस्या डोके वर काढत आहे. त्याचबरोबर वाहन चालकास अपघाताला सामोरे जावे लागत आहे. ही वस्तुस्थिती सध्या निर्माण झाली आहे. यामध्ये मोकाट गुरे आणि शेतकऱ्यांच्या गुरांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे.

दरम्यान, रात्रीच्या सुमारास सावरोली-खारपाडा या रस्त्यावर अवजड वाहनांची रेलचेल असल्यामुळे वाहनांच्या धडकेत या गुरांना प्राणास मुकावे लागते. दरम्यान, खालापूर, खोपोली, आपटा, मोहपाडा, रसायनी या परिसरात मोकाट गुरांनी आपला मोर्चा रस्त्यावर वळविला आहे. परिणामी वाहतुकीची कोंडी, अपघातांचा धोका वाढला आहे.



## १८ दिवसांची जिल्हा प्रशासनाची स्वच्छता मोहीम

# अस्वच्छ ठिकाणांचा करणार कायापालट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण व शहरी यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने स्वच्छता ही सेवा मोहीम १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. यावर्षीच्या 'स्वच्छता ही सेवा २०२४'साठी 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' ही थीम निश्चित केली आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील सर्व अस्वच्छ ठिकाणे निवडून ती कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी



नियोजन करावे, तसेच स्वच्छता ही सेवा (एसएचएस) मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'स्वच्छता ही सेवा' या मोहिमेच्या अंमलबजावणी अनुषंगाने आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, स्वच्छतेचा प्रसार करण्यावर भर देणे आणि स्वच्छतेला संस्कृती म्हणून अंगीकारणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी जनजागृती करण्यात यावी, तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचे सहकार्य घ्यावे, असे जावळे यांनी सांगितले.

जिल्ह्यात १८ सप्टेंबरपासून स्वच्छता ही सेवा मोहिमेचा शुभारंभ होणार आहे. जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून मोहिमेचे नियोजन करावे. जिल्ह्यातील सर्व अस्वच्छ ठिकाणे निश्चित करून त्या ठिकाणी भविष्यात कचरा होणार नाही याबाबत नियोजन करावे. त्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत. कचरा होऊ नये यासाठी नियोजन करावे. तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असे जावळे यांनी सांगितले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी यांनी अभियानाविषयी माहिती दिली.

स्वच्छता ही सेवा २०२४ मोहिमेंतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबीर या उपक्रमाद्वारे सफाई मित्रासाठी एक खिडकी योजनेद्वारे गृह निर्माण, घरगुती टॅब कनेक्शन-अमृत, कोणतीही राज्य योजना, वैयक्तिक शौचालय, वीज-पीएम सौभाग्य, बँकिंग-पंतप्रधान जनधन योजना, उज्ज्वला गॅस योजना, आरोग्य विभाग- आयुष्यमान भारत, लसीकरण- मिशन इंद्रधनुष्य, क्रेडिट ॲक्सेस- बँक वित्तपुरवठा लिंकेज, विमा- सुरक्षा विमा योजना, जीवन गती विमा योजना या सर्व योजनांच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांकरिता तालुकास्तरावर विशेष शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, निर्मला कुचिक, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी जयवंत गायकवाड आदी उपस्थित होते.

# स्व. मीनाक्षीताई पाटील : एक राजकीय जीवन संघर्ष

प्रा. महेश बिऱ्हाडे

**कौटुंबिक पार्श्वभूमी :** धेरंड, ता. अलिबाग, जि. रायगड या गावी जन्मलेले कै. नारायण नागू पाटील ऊर्फ आप्पासाहेब या सामान्य शिक्षकाने आपल्या तेजस्वी विचाराने रायगड जिल्ह्यात गरीब व कष्टकरी शेतकऱ्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध अंगार पेटविला आणि गरीब, कष्टकरी, शेतकरी खोतीविरुद्ध पेटून उठला. परिणामी, १९३२ ते १९३९ तब्बल सात वर्षे शेतकरी संप चालला. रायगड जिल्ह्यात हा संप 'चरीचा शेतकरी संप' या नावाने प्रसिद्ध झाला. त्यामुळे केवळ रायगडच्याच नव्हे तर, महाराष्ट्रातील सर्व जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना 'कसेल त्याची जमीन' या न्यायाने कुळकायद्याद्वारे स्वतःची हक्काची शेतजमीन प्राप्त झाली. या कुळकायद्याचे बरचसे श्रेय चरीच्या शेतकरी संपाला जाते. अशा या नारायण नागु पाटील उर्फ आप्पासाहेब यांच्यानंतर त्यांची कर्तृत्ववान मुले विषेषतः कै. दत्ता पाटील आणि कै. प्रभाकर पाटील या पाटीलबंधू म्हणून महाराष्ट्राला परिचित असलेल्या भावंडांनी रायगड जिल्ह्यातील गोरगरीब व सामान्य जनतेला न्याय मिळावा यासाठी अनेक आंदोलने व लढे उभारले. त्यामध्ये प्रभाकर पाटील यांच्या आक्रमक अशा शैलीमुळे रायगड जिल्ह्याी विकासाची गंगा वेगाने वाहिली. त्यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 'झेडपी' म्हणजे 'झटपट प्रोग्रेस' हा विकासाचा नवा मंत्र सांगितला. त्याचबरोबर त्या मंत्राची प्रभावी अंमलबजावणीदेखील केली. म्हणूनच आजही अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या 'शिवतीर्थ' या इमारतीच्या प्रवेशद्वारावर ''सेवेच्या ठायी तत्पर पाटील प्रभाकर'' हे कोरलेले शब्द त्यांच्या कार्यकौशल्याची साक्ष देतात. प्रभाकर पाटील 'भाऊ' या नावाने रायगडात ओळखले जात असत. भाऊंच्या सर्व कार्यामध्ये दादांची म्हणजे दत्ता पाटील यांची साथ असल्याने 'दादा-भाऊ' या पाटील बंधूंमुळे रायगड जिल्ह्यात अनेक योजना कार्यरत होऊन विकासाचा नवा 'रायगड पॅटर्न' तयार झाला होता. कै. ना.ना. पाटील यांच्यापासून सुरु झालेला संघर्षाचा वारसा पाटील बंधूंनी समर्थपणे वाढविला. हा वारसा नंतरच्या पिढीनेही चालू ठेवलेला आहे. यामध्ये प्रभाकर पाटील यांची मुले विशेषतः माजी आ. जयंत पाटील, माजी आमदार तथा राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील, माजी आ. पंडित पाटील एवढेच नव्हे तर, चौथ्या पिढीतील चित्रलेखा पाटील, आस्वाद पाटील, चित्रा पाटील यांनीदेखील यशस्वीपणे चालविलेला आहे. अशा या संघर्षातून राजकीय, सामाजिक स्तरावर नवीन वैचारिक वारसा निर्माण करणाऱ्या व स्वतःच्या तेजस्वी अशा व्यक्तिमत्त्व व विचाराने अगदी विरोधकांच्या मनातदेखील उच्च स्थान प्राप्त करणाऱ्या अलिबाग-मुरुड मतदारसंघाचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती म्हणजेच स्व. मीनाक्षीताई पाटील होय.

**बालपण :** स्व. मीनाक्षीताई पाटील यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे श्रीमती सुलभा प्रभाकर पाटील यांच्या माहेरी, रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भडवळ या गावी दि.१३ सप्टेंबर १९४८ रोजी झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी प्रचंड असा पाऊस व वादळ होते. त्यावेळी जणू निसर्गाने रौद्ररुप धारण करुन एक वादळच मी पृथ्वीवर पाठवत आहे, असाच संकेत दिला होता. निसर्गाने तेव्हा दिलेला संकेत जेव्हा मीनाक्षीताई विधानसभेत एखाद्या प्रश्नाच्या वेळेस रौद्ररुप धरण करुन सभागृह दणाणून सोडले होते, तेव्हा निसर्गाचा तो संकेत खरा होता हे सिद्ध झाले होते.

मीनाक्षीताईंना लहानपणापासून 'बेबी' हे टोपण नाव आहे. आजही त्या बेबीताई म्हणूनच रायगडात जास्त ओळखल्या जात. त्यांच्या घरी कोणताही कार्यकर्ता आल्यास बेबीताई आहेत का? अशी चौकशी करत असे. असे मी स्वतः अनुभवले आहे. बेबीताईंच्या लहानपणाबाबत श्रीमती सुलभा पाटील ऊर्फ काकूंना विचारले असता, त्यांनी सांगितले की, बेबीचा जन्म हा जणू एक उत्सवच होता. काकूंच्या माहेरी जन्माला आलेली ही पहिली नात म्हणून तिचं खूपच कोडकौतुक झालं. त्या समारंभातील एक झबले शेवटपर्यंत काकूंच्या संग्रही होते. काकूंनी सांगितल्याप्रमाणे बेबी ही लहानपणापासून हुशार, पण तितकीच हुड व हट्टी होती. एखादी बाब मनासारखी घडली नाही तर पटकन रागावत असे. शाळेत जाताना केसांची वेणी घट्टच पाहिजे, असा तिचा आग्रह असायचा. तिचा हट्टी स्वभाव व हुशारी दोन्हीही कै. नारायण नागू पाटील यांना आवडायची. ते स्वतः तिचा अभ्यास घेत असत. तिला आवडणाऱ्या टापटिपपणामुळे ती आप्पासाहेबांची लाडकी बनली होती; परंतु लहानपणी बेबीताई फारच सोवळे ओवळे पाळत असे. परंतु, नंतर समाजकारण व राजकारणात असताना लहानपणी सोवळे पाळणारी मुलगी हीच काय? असा प्रश्न पडत असे. प्रभाकर पाटलांनी बेबीला लोकसहभागाचे जे धडे दिले होते, त्याचीच ही किमया होती.

मीनाक्षीताई पाटील यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे, तर उच्च शिक्षण जनता मंडळाच्या अलिबाग येथील महाविद्यालयात झाले. खरे तर, बेबीताईंनी वकील व्हावे, ही पाटील कुटुंबियांची इच्छा होती. परंतु, त्या काळात मुलींसाठी आजच्यासारख्या शैक्षणिक सुविधा नव्हत्या, शिवाय काही सामाजिक, कौटुंबिक अडचणींमुळे बेबीताई वकिलीचे शिक्षण घेऊ शकल्या नाहीत. जर त्या वेळीस त्यांना वकिलीचे शिक्षण खरंच लाभले असते, तर ॲड. दत्ता पाटलांसारखा आणखी एक आक्रमक वकील पाटील घराण्याने महाराष्ट्राला दिला असता, यात शंका नाही. पाटील कुटुंबियांची, बेबीताईंच्या शिक्षणाच्या इच्छेची उणीव त्यांनी त्यांच्या स्वकर्तृत्वावर भरुन काढली. वकिलांसाठी कायदे तयार करणाऱ्या विधानसभेत त्यांनी आपले भक्कम स्थान निर्माण केले होते. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच मीनाक्षीताई त्यांचे वडील प्रभाकर पाटील उर्फ भाऊंबरोबर अनेक सभा-संमेलनांमध्ये जात असत. भाऊंसोबत त्यांचे हे जाणे कधी हट्ट असे, तर कधी भाऊंचा आग्रह म्हणून असे. त्यामागे भाऊंचा मोठा दूरदृष्टीकोन होता. तो दूरदृष्टीकोन आज सफल झालेला दिसतो. मीनक्षीताईंच्या घरचे वातावरण राजकीय व सामाजिक स्वरुपाचे असल्यामुळे साहजिकच या वातावरणाचा त्यांच्यावर व पर्यायाने सर्वच भावंडांवर प्रभाव पडलेला आहे. मीनाक्षीताई तेरा-चौदा वर्षांच्या असतानाचा काळ होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा, संयुक्त महाराष्ट्र मुंबईसह व्हावा यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीने जोर धरला होता. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा या विचाराला स.का. पाटील यांचा विरोध होता. या पार्श्वभूमीवर स.का. पाटील अलिबाग येथे अलिबाग नगरपरिषदेच्या एका कार्यक्रमासाठी आले होते. या कार्यक्रमास त्यांना आणू नये म्हणून शेतकरी कामगार पक्षाचा सर्व कार्यक्रमाला विरोध होता. तरीदेखील स.का. पाटील अलिबाग येथे आले होते. शेतकरी कामगार पक्षाने ठरविल्याप्रमाणे जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली काळे झेंडे दाखवून स.का. पाटील यांच्याविरोधात निदर्शने केली. त्यावेळी या तेरा-चौदा वर्षांच्या बेबीने गर्दीतून धावत जाऊन स.का. पाटील यांच्या हातात अक्षरशः बांगड्या भरल्या होत्या. त्यावळी या बेबीचा अचाट असा हा पराक्रम पाहून त्या आंदोलनाचे नेते जयंतराव टिळक यांनी ही मुलगी भविष्यात मोठी पुढारी होईल, अशी भविष्यवाणी केली होती. ती भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली आहे. विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाबरोबरच सर्वपक्षीय महिला आमदारांचे नेतृत्व मीनाक्षीताईंकडेच होते, हे महाराष्ट्राने पाहिलेले आहे.



**राजकीय वाटचाल :** असे म्हटले जाते की, कोणत्याही कामात निपुण व्हायचे झाल्यास त्याची पूर्वतयारी व सराव लागतो. अशी पूर्वतयारी व सरावदेखील राजकारणच्या पार्श्वभूमीवर मीनाक्षीताईंचा सुरु होता तो बालपणापसूनच. प्रभाकर पाटील यांच्या तालमीमध्ये त्या तयार झाल्या होत्या. शेतकरी कामगारे पक्षाचे स्वरुप महाराष्ट्रात नेहमीच विरोधी पक्ष म्हणून राहिलेले आहे. विरोधी पक्षाला नेहमीच जागरुक राहून सरकारवर, सरकारी धोरणांवर वचक ठेवावा लागतो अन्यथा लोकशाहीमधील सरकार हुकूमशाही किंवा एकाधिकारशाही पद्धतीने चालवते, म्हणून लोकशाही जागृत ठेवण्यासाठी सभा, संमेलन, मोर्चे, संप, हरताळ, बंद यासारख्या सनदशीर मार्गांचा वापर करावा लागतो. राज्यात शेतकरी कामगार पक्ष विरोधी पक्ष असल्याने शेतकरी कामगार पक्षाने जनमत जागृतीसाठी वळोवेळी अनेक आंदोलने केलेली आहेत. रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्ष या दृष्टीने आघाडीवर होता व सध्याही आहे. त्यामुळे विविध आंदोलने, अन्याय निवारणार्थ उपक्रम या रायगड जिल्ह्यात प्रभाकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली केले गेले होते. या सर्व बाबींचे संस्कार मीनाक्षीताईंवर झाले. त्यांनी लहानपणापासूनच या कामात स्वतःला झोकून दिले होते. राजकारणासोबत समाजकारणातही त्या पुढे होत्या. शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रथमतः त्यांनी १९६८ मध्ये भूविकास बँकेत नोकरी करणे पसंत केले होते. परंतु, त्यांची समाजाबाबतची ओढ व राजकीय वातावरणातील संस्कार यामुळे त्यांनी नोकरीचा १९७४ मध्ये त्याग केला. दरम्यान, १९७७-७८ साली प्रथमतः पोयनाड-आंबेपूर ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून नंतर आंबेपूर ग्रामपंचायतीच्या पहिल्या महिला सदस्या व पहिल्या महिला सरपंच म्हणून निवडण्यात आल्या. त्यांच्या कारकीर्दीमध्ये ग्रामपंचायत आंबेपूर एक रायगड जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण पंचायत म्हणून नावारुपास आली. जिल्हा परिषद व शासनाच्या सर्व योजनांना गतीशीलरित्या अंमलात आणून ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अनेक समस्या सोडविल्या. काही ठिकाणची अतिक्रमणे स्वतः सरपंच या नावाने जागेवर जाऊन प्रत्यक्षात हटवले. अनेक बेघरांना घरे जमिनी/प्लॉट मिळवून दिलेत. शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या योजना पुरेपूर अंमलात आणल्या. काहींना पंचायतीमार्फत रोजगार दिला, त्यामुळे आंबेपूर ग्रामपंचायतीला अल्पवधीत एक कुशल प्रशासन असलेली पंचायत बनवली. आंबेपूर ग्रामपंचायत हद्दीतील आठवडा बाजार दर सोमवारी भरतो. या बाजारासाठी मीनाक्षीताईंनी दिलेला कायदेशीर लढा म्हणजे एक कर्तबगार महिला सरपंचाची कार्यकौशल्याची साक्ष आहे. ग्रामपंचायत आंबेपूरचा दर सोमवारचा आठवडे बाजार ही स्व. मीनाक्षीताई यांची कामगिरी आहे. हे सर्व करत असताना काही विरोधकही त्यांना मिळाले; परंतु प्रभाकर पाटील यांची शिकवण व स्वतःची आक्रमक शैली यामुळे मीनाक्षी पाटील सर्व विरोधकांना पुरुन उरल्या. त्यामुळे त्यांचे नाव अल्पावधीतच रायगड जिल्ह्यात सर्वमुखी झाले. परिणामतः त्यांची जिल्हा परिषदेमध्ये १९७९ साली जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीवर तज्ज्ञ सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. पोयनाड व आंबेपूर ग्रामपंचायतीमध्ये केलेली कार्ये व तत्कालिन सामाजिक, राजकीय परिस्थितीचा पडलेला प्रभाव पाहता त्यांनी राजकारण व समाजकारण या दोन्ही बाबी समर्थपणे पेलल्या होत्या. तत्पूर्वी, आणीबाणीच्या काळात पाटील बंधूंना अटक झालेली होती. त्यावेळेस त्यांनी प्रभाकर पाटील यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी भाऊंना पत्रे लिहिलीत. सर्व कैद्यांसमोर त्या पत्रांचे जाहीरपणे वाचन केले जात असे. परिणामतः तुरुगांतील सर्व लोक मीनाक्षीताईंना 'पत्रकन्या' असे संबोधत असत.

दरम्यान, १९७५ सालीच त्या रायगड जिल्ह्याच्या मराठी पत्रकार संघाच्या पहिल्या महिला अध्यक्षा बनल्या होत्या. तब्बल पंधरा वर्षे त्या पत्रकार संघाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संघाचा कायापालट होऊन अनेक नवीन उपक्रम 'रायगड पॅटर्न' म्हणून प्रसिद्ध झालेले आहे. याविषयी अधिक माहिती पुढील प्रकरणांमध्ये आहे. आपल्या राजकीय वाटचालीमध्ये मीनाक्षीताईंनी १९९२ मध्ये वैजाळी जिल्हा परिषद मतदारसंघातून निवडणूक लढविली व बहुमताने निवडून आल्या. वैजाळी मतदारसंघाच्या पहिल्या महिला रायगड जिल्हा परिषद सदस्य होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. ''रायगड जिल्हा परिषद हेच माझे विद्यापीठ व प्रभाकर पाटील या विद्यापीठाचे कुलगुरु होते'', असे त्या अभिमानाने सांगत असत. याच रायगड जिल्हा परिषदेमध्ये मीनाक्षीताईंनी संसदीय कार्यप्रणालीचे प्राथमिक धडे घेतले. अनेक समस्या मांडून, कित्येकांना न्याय मिळवून दिला. अचंबित करणारे विचार मांडले, म्हणून त्या जिल्हा परिषदेला स्वतः विद्यापीठ म्हणत असत.

एकीकडे समाजकारण, दुसरीकडे राजकारण, तिसरीकडे पत्रकारिता अन् त्या जोडीला शेतकरी कामगार पक्षाची महिला आघाडी. या सर्व आघाड्यांवर मीनाक्षीताई आघाडीवर राहिल्या. परिणामतः त्यांना १९९५ साली शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग-उरण मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत प्रचंड मतांनी त्या निवडून आल्या. निवडून आल्यानंतर त्यांनी मतदारसंघामध्ये अनेक लोकोपयोगी कार्ये केली. विधानसभेचे असे एकही अधिवेशन नव्हते, ज्यामध्ये मीनक्षीताईंचा आवेष व रौद्रावतार पहायला मिळाला नाही. अल्पवधीतच एक व्यासंगी व अभ्यासू आमदार म्हणून त्यांना मान्यता मिळाली. परिणामी, २००० च्या निवडणुकीमध्ये त्या पुन्हा विधानसभेवर अलिबाग-उरण मतदारसंघावर निवडून गेल्या. याच काळात त्यांना मत्स्य व बंदर विकास खात्याच्या राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या कार्यकाळामध्ये जे निर्णय घेतले, त्याप्रसंगी त्यांनी सर्वसामान्य मच्छिमार बांधवांना नजरेसमोर ठेवून निर्णय घेतले. बंदर खात्याचे काम करत असताना कोकणातील बंदरांच्या दृष्टीने आवश्यक असे विकासात्मक निर्णय घेऊन बंदरांच्या विकासाला चालना दिली. मात्र, सरकारमध्ये राहून शेतकरी कामगार पक्षाच्या तत्त्वांविरोधी निर्णय सरकार घेत असल्याचे दिसून आल्यावर शेतकरी कामगार पक्षाने आदेश दिल्याबरोबर शेतकरी कामगार पक्षच्या इतर मंत्र्यांबरोबर मीनाक्षीताईंनीदेखील मंत्रीपदाचा राजीनामा दिला. शेतकरी कामगार पक्षाच्या आमदारांनी मंत्रीपदाचे राजीनामे सादर केल्यानंतर तत्कालीन सत्ताधारी पुढाऱ्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या पाच आमदारांमुळे सरकारला कोणताही धोका नाही असे सांगत शेकापचा निर्णय चुकीचा असल्याचे स्पष्ट केले होते. त्यावेळेस शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. दत्ता पाटील व आमदार मीनाक्षीताई पाटील यांनी प्रसिध्दी माध्यमाशी बोलताना प्रश्न संख्येचा नसून, तत्त्वांचा आहे, असे बाणेदारपणे उत्तर दिले होते. त्यामुळे मीनाक्षीताईंच्या तत्त्वनिष्ठ राजकारणाचा परिचय महाराष्ट्राला झाला.

२००४-०५ च्या निवडणुकीत मीनाक्षीताईंना पराभूत करण्यासाठी विरोधकांनी नामी युक्ती वापरली. ती म्हणजे, नामसाधर्म्य असलेलल्या अनेक मीनाक्षी पाटील नावाच्या डमी उमेदवार विरोधकांनी निवडणुकीत उभ्या केल्या, त्यामुळे मतविभाजन होऊन मीनाक्षीताईंना फार थोड्या मतांनी पराभूत व्हावे लागले. अर्थात, पराभव पचवायलादेखील फार धैर्य व अंतःकरण लागते. मीनाक्षीताईंनी हा पराभव सहज पचवला. अर्थात, पराभवानंतर शांत बसतील त्या मीनाक्षीताई कसल्या? त्यांनी पुन्हा नव्याने पक्षसंघटना मजबूत करत, कार्यकर्त्यांचे जाळे विणून २००९च्या निवडणुकीत पुनर्रचित अलिबाग-मुरुड मतदारसंघातून पुन्हा एकदा प्रचंड मतांनी विधानसभेवर निवडून आल्या. विधानसभेत अत्यंत धाडसी, कणखर व सरकारला सळो की पळो करुन सोडणाऱ्या आमदार म्हणून त्यांचा नावलौकिक होता. आजही आहे.

स्व. मीनाक्षीताई हे व्यक्तिमत्त्व एक आगळे व्यक्तिमत्त्व होते. स्मरणशक्ती ही दैवी देणगी त्यांना लाभलेली. त्यांच्या राजकीय वाटचालीमध्ये त्यांना प्रभाकर पाटील व दत्ता पाटील यांच्यासारख्या धुरंधर राजकारण्यांचे मार्गदर्शन लाभले होते. त्यांची प्रेरणा व प्रेमही मिळाले; परंतु यशस्वी होण्यासाठीची वाटचाल त्यांनी स्वतःच केलेली आहे. ''यशस्वीतेसाठी केवळ वारसा किंवा मार्गदर्शन उपयोगी नसते, स्वकर्तृत्व नसेल तर असे सर्व घटक गौण ठरतात'', त्यामुळे मीनाक्षीताई महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकल्या. त्याला त्यांचे स्वतःचे प्रयत्नही कारणीभूत आहेत, त्यामुळेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाला एक वेगळी शैली प्राप्त झाली होती. त्यांच्या कार्यकौशल्याचा आढावा घेतल्यानंतर अभिमान वाटावा, असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व होते. मीनाक्षीताईंच्या यशस्वीतेमध्ये त्यांच्यातील एक व्यासंगी व्यक्तित्वाचे व त्यांच्या विचारांचे योगदान मोठे होते. आज स्व. मीनाक्षीताई आपल्यात नाहीत हे स्वीकारणे जरी जड जात असले, तरी कालमहिमा अगाध असल्याने ते स्वीकारावे लागते. पण, त्यांनी दिलेले प्रेम, प्रत्येकाच्या पाठीवर दिलेली शाबासकी किंवा कोणत्याही कामाचे केलेले तोंडभरून कौतुक आणि त्यांचा विचार यामुळे स्व. मीनाक्षीताई आजही आपल्यातच आहेत असे वाटते. अशा प्रेमळ, मातृतुल्य स्व. मीनाक्षीताई पाटील यांना त्रिवार लाल सलाम!

**(लेखक को.ए.सो. लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय पेझारीचे प्राचार्य आहेत.)**



# बंधाऱ्यांची सुरक्षा रामभरोसे

## केटी बंधाऱ्यांवरील भंगार व अवशेषांवर चोरांची नजर

## पोलादपूर शहरातील पुराला कारणीभूत ठरवून तोडण्याची मागणी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथे केटी बंधाऱ्यासंदर्भातील कार्यालय गेल्या अनेक वर्षांपासून बंद झाले असून, दिवील आणि लोहारे या दोन्ही बंधाऱ्यांची देखभाल दुरूस्ती तसेच जबाबदारी रामभरोसे झाली आहे. यामुळे हे दोन्ही केटी बंधारे रातोरात गायब करण्यात येण्याची शक्यताही तालुक्यात व्यक्त होत आहे.

तालुक्यातील अनेक ग्रामस्थांकडून विविध विकासकामांची मागणी केल्यानंतर जुनी विकासकामे भुईसपाट करताना त्यातील काही भाग व अवशेष पुन्हा वापरात आणून नवीन कामांमध्ये बेमालूमपणे वापरणाऱ्या बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदारांसाठी तालुक्यातील काही भंगार आणि अवशेष चोरांकडून बिल्डींग मटेरियल सप्लाय करण्याचे सौहार्दपूर्ण सहकार्य केले जात असते. याचाच भाग म्हणून दिवील आणि लोहारे येथील केटी बंधारे पोलादपूरच्या उत्तरवाहिनी सावित्री नदीला येणाऱ्या पुराला कारणीभूत ठरवून भुईसपाट करण्याची मागणी दोन महिन्यांपूर्वी भंगार व अवशेष चोरांच्या सूचनेवरून शासनअमान्य डिजिटल माध्यमांकडून करण्यात आली होती.

दिविल आणि लोहारमाळ येथे तब्बल ३५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या दोन कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्यांपैकी दिवीलचा बंधारा जीर्ण झाला असताना २००५ च्या अतिवृष्टीमुळे आलेल्या उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या महापुरामध्ये वाहून गेला, तर लोहारमाळच्या बंधाऱ्याला नदीच्या पात्रात वाहून आलेल्या झाडांच्या खोडांचे हादरे बसून तो कमकुवत झाला. त्यानंतर काही काळाने बंधाऱ्याची डागडुजी करताना हिवाळी आणि उन्हाळी या बंधाऱ्याखालून नदीच्या उथळ पात्रातून एसटीच्या गाड्यांसह अन्य प्रकारची वाहतूक सुरू झाली. हे काम संपल्यानंतर आजमितीस बंधाऱ्यावरून वाहतूक सुरू राहिली असून, या बंधाऱ्यावरून एसटीची गाडी अथवा लाकडाचे ओंडके भरलेले ट्रक जाऊ लागले की हा बंधारा थरथरत असल्याचा थरारक अनुभव अन्य वाहनांतील प्रवाशांसह बंधाऱ्यावरून चालत जाणाऱ्या पादचाऱ्यांनाही घ्यावा लागत असे.

यापैकी लोहारे येथील केटी बंधाऱ्यालगत लोहारे तुर्भे पुलाचे बांधकाम होऊन तो कार्यान्वितही झाला आहे. मात्र, दिविल येथील केटी बंधारा २००५ साली अतिवृष्टी व महापूराच्या काळात फुटला आणि नादुरूस्त झाल्याने वाहतुकीस व रहदारीस अयोग्य ठरला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये २००५ साली तसेच २०२१ साली या चरई पुलाच्या चरई गावालगतच्या ॲप्रोच रोडचा भराव वाहून गेल्याने दोनवेळा ॲप्रोच रस्त्याचे बांधकामदेखील करण्यात आले. मात्र, गेल्या तीन वर्षांपूवी पोलादपूर तालुक्यातील काँक्रिटचे रस्ते, लोखंडी पूल, खडी व लालमाती तसेच इमारतीचे अवशेष यांचा वापर सर्रास सरकारी विकासकामांमध्ये करणाऱ्यांनी काही महिन्यांपासून दिवील आणि लोहारे येथील कोल्हापुरी तंत्राच्या म्हणजेच केटी बंधाऱ्यांमुळे पोलादपूर शहरात पुरस्थिती निर्माण होत असल्याच्या चर्चा घडविल्या.

मात्र, प्रत्यक्षात या दोन्ही केटी बंधाऱ्यांवरून उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पुराचे पाणी वाहात असल्याने हे दोन्ही बंधारे पोलादपूर शहरातील पुरास कारणीभूत नसल्याचे उघड आहे.

लोहारमाळ गावाच्या हद्दीतील



कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्याचा उपयोग सध्या तुर्भे खोंडा, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, वझरवाडी, दिवील आणि हावरे भागात जाण्यासाठी तेथील ग्रामस्थ करीत असताना त्याठिकाणी नवीन लोहारे तुर्भे पूल उभारण्यात आला. या पुलाच्या उत्तरेला पूर्वीचा केटी बंधारा आहे. त्यामुळे पोलादपूर चरई पुलानंतर लोहारेतील नवीन पूल आणि त्यानंतर लोहारे केटी बंधारा तसेच तेथून दोन कि.मी अंतरावर दिवील येथील केटी बंधारा असल्याने या पुलांमुळे पोलादपूर शहरातील पूरस्थिती कशी निर्माण होईल, असा सवाल तालुक्यातील सुज्ञ जनतेला सतावू लागला असताना, या केटी बंधाऱ्यांना चांगल्या दर्जाचे तोडीचे ताशीव दगड असून, ते दगडी इमारत आणि लोडबेअरिंग जोत्याच्या बांधकामांना उपयुक्त असल्याने दोन्ही केटी बंधारे पोलादपूरच्या पूरस्थितीला कारणीभूत असल्याची चर्चा घडवून नजीकच्या काळात दोन्ही केटी बंधारे पाडून परस्पर त्यांची वासलात लावण्याचा डाव भंगार व अवशेषांचा विकासकामे आणि भरावासाठी वापर करणाऱ्यांकडून होणार असल्याचे संकेत काही बांधकाम व्यावसायिकांकडून देण्यात येत आहेत.

# मोबाईल प्रात्यक्षिक व्हॅन करणार मतदारांची जागृती

**। रायगड । खास प्रतिनिधी।**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यंत्राचे मतदारांना प्रशिक्षण, प्रसार, प्रसिद्धी व जनजागृती करण्यात येणार आहे. यासाठी प्रात्यक्षिक केंद्र आणि मोबाईल प्रात्यक्षिक व्हॅन तयार करण्यात आली आहे. या मोबाईल प्रात्यक्षिक व्हॅन १५ तालुक्यातील सात विधानसभा क्षेत्रात फिरणार आहेत. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मोबाईल प्रात्यक्षिक व्हॅनला मंगळवारी हिरवा झेंडा दाखवून या जनजागृती कार्यक्रमास प्रारंभ केला.

१० ऑक्टोबरपर्यंत ही मोबाईल व्हॅन १५ तालुक्यातील गावे, वाड्या, वस्ती येथे भेट देऊन ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत जनजागृती करणार आहे. या मोबाईल व्हॅनद्वारे प्रात्यक्षिक करता येणार आहे. तसेच प्रात्यक्षिक केंद्र प्रत्येक विधानसभा मतदार संघस्तरावर मतदारांना प्रात्यक्षिकासाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या क्षेत्रात, गाव व शहरातील मुख्य चौक, बाजार, शासकीय कार्यालये, ग्रामपंचायतींची कार्यालये, सभांच्या ठिकाणी इत्यादी मोक्याच्या ठिकाणी मोबाइल व्हॅनद्वारे ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची प्रात्यक्षिके दाखविण्यात येणार आहेत. तसेच मतदारांना अभिरुप मतदान करण्यासाठी ईव्हीएम जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.



# महामार्गावर चिखलाची डोकेदुखी

## चिखल अंगावर उडाल्याने वादाचे प्रसंग

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवाराष्ट्रीयमहामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मागील १७ वर्षांपासून रेंगाळले आहे. मृत्यूचा सापळा म्हणून ओळख असलेल्या या महामार्गाची दुरवस्था आजही कायम आहे. पावसाळ्यात तर हा मार्ग प्रवास करण्याच्या लायकीचा उरत नाही. फोर व्हीलर वाल्यांनो जरा दमानी, अंग भिजतेय हो चिखलानी, अस म्हणण्याची वेळ दुचाकी स्वार व पादचारी यांच्यावर आलीय.

सध्या या मार्गावर सर्वत्र चिखल, खड्ड्यात साचलेली पाणी, दगड गोटे आणि पसरलेली खडी ही मोठी समस्या झाली आहे. या मार्गावरून जाणारे पादचारी, दुचाकीस्वार या समस्येने अक्षरशः बेजार झाले आहेत. ऐन सणात या मार्गावर वाद निर्माण होत आहेत. वेगवान चारचाकी, एसटी बस किंवा इतर मोठी वाहने वेगात जातात, अशावेळी येथील चिखल किंवा खड्ड्यात साचलेले पाणी दुचाकीस्वार आणि पादचारी यांच्या अंगावर जोरात उडते. आणि कपडे घाणपाणी अथवा चिखलाने रंगून जातात, मग संतप्त नागरिकांकडून ते मोठे वाहन अडवून वादाच्या घटना घडतात. असाच प्रकार नागोठणे ते वाकणच्या दरम्यान नुकताच घडला. एक चारचाकी इनोव्हा वाहन चालक वेगात जाताना चिखलातून गेला, आणि तो चिखल दुचाकी प्रवाशांच्या अंगावर उडाल्याने त्यांचे कपडे खराब झाले. त्यामुळे बराच वेळ इथं वाद झाला. वाहनचालकाला दोन दुचाकीस्वारांनी समज दिली व सोडून दिले. महत्त्वाच्या कामासाठी जात असताना अशी घटना घडली तर काम खोळंबते, शिवाय मोटारसायकलवरील नियंत्रण सुटून अपघातही होऊ शकतो, तर मळलेले कपडे पुन्हा कपडे बदलण्यासाठी जाण्यात वेळ जातो, मानसिक त्रास ही होतो, त्यामुळे चिखल आणि खड्ड्यातून वाहने हळू चालवा, असे आवाहन जितेंद्र कांबळे यांनी सांगितले.

# मुंबई-गोवा महामार्गावर गुरांचा संचार

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड, खांब, सुकेळी खिंड, वाकण मार्गावर रस्त्यात गुरे उभी अथवा बस्तान मांडून बसत असल्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या जवळील शेतजमिनी मुंबई, पुणे दिल्लीकडील धनिकांना विकल्या असून गेली दहा ते बारा वर्षांपासून जमिनी विकण्याचा व्यावसाय जोमाने सुरु आहे. यातच आपल्याकडील शेती विकणाऱ्या शेतकऱ्यांनी आपली बिनकामी गुरे मोकाट सोडली आहेत. मुंबई गोवा महामार्गावरील शेतजमीन मुंबई, पुणे तसेच दिल्लीकडील धनिकांना तसेच खाजगी कंपनीला विकल्याने संबंधित मालकांनी विकत घेतलेल्या शेतीभोवती तारेचे कुंपण घातले आहे. यामुळे शेती विकलेल्या शेतकऱ्यांची गुरे चरण्यासाठी जागा राहिली नसल्यामुळे या शेतकऱ्यांनी गुरे मोकाट सोडली आहेत. ही गुरे मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध बस्तान मांडून बसत आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत आहे. तर कधी कधी वाहतूक कोंडी निर्माण होऊन अपघात होताना दिसत आहेत.गुरांना अपघात होऊन गुरे जखमी झाली तर गुरांचा मालक येऊन भरपाई मागत आहे. परंतु या गुरांमुळे अपघात होऊन एखादा प्रवासी जखमी झाला तर मालक फिरकत ही नाही अशा मोकाट गुरांचा बंदोबस्त संबंधितांकडून करण्यात यावा अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.

# द्विलक्षी अभ्यासक्रम होणार बंद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बारावीला समकक्ष असलेल्या दोन वर्षांच्या द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाचे यंदाचे हे अखेरचे वर्ष ठरणार आहे. पुढील शैक्षणिक सत्रापासून या द्विलक्षी अभ्यासक्रमाऐवजी कौशल्य शिक्षणावर आधारित असलेला नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. यासाठी संबंधित महाविद्यालयांची यंदाच्या शैक्षणिक वर्षांत पुढील नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची तयारी करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यात सध्या सुरू असलेले द्विलक्षी अभ्यासक्रम बंद करून एनएसक्यूएफ हा नवीन व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे.

डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने, रोजगार, स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करून महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा, या उद्देशाने १९७८-७९ पासून व्यवसाय विषयांची ३० टक्के व्याप्ती असलेले २ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले होते. हा अभ्यासक्रम बारावी समकक्ष म्हणून ओळखला जात असल्याने अजूनही शेकडो विद्यार्थी इकडे प्रवेश घेतात.

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत अनेक तांत्रिक स्तरावरील अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यासोबतच कृषी, मत्स्य या गटातील एकूण १६ व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येतात. अशा स्थितीत राज्यात सुरू असलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमातील बदल झालेले नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत असे तांत्रिक शिक्षण मिळावे, यासाठी तांत्रिक गट, वाणिज्य गट व कृषी गटातील एकूण १३ व्यवसाय अभ्यासक्रम नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेम वर्कशी सुसंगत केले आहेत. यामुळे मत्स्यगटातील फिश प्रासेसिंग टेक्नॉलॉजी व फ्रेश वॉटर फिश कल्चर तसेच तांत्रिक गटातील केमिकल प्लॅंट ऑपरेटर हे अभ्यासक्रमही बंद केल्याने त्याच पार्श्वभूमीवर द्वलिक्षी अभ्यासक्रम बंद केला जाणार आहे.

# वाहतूक पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

उरण-पनवेल रोडवर अप्पाच्या ढाब्यासमोर अज्ञात ट्रेलरला मागून ठोकर दिल्याने पीकअप चालकाच्या गुढघ्याला लागल्याने वाहतूक पोलिसांनी त्याला लगेच रुग्णवाहिकेने हॉस्पिटलला रवाना केले. त्यानंतर येथील वाहतूक सुरळीत करण्यात आली.



उरण-पनवेल हायवे, बॉम्बेपाडा, साईकृपा ढाबा येथे टेम्पो चालक गुल्फाम लिया लियाज अहमद याने अज्ञात ट्रेलरला पाठीमागून धडक दिली. यात चालक किरकोळ जखमी झाला. जखमी इसमाला गव्हाण फाटा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार गणेश पाटील, पोलीस नाईक रवींद्र पार्ट यांनी कामोठे एमजीएम हॉस्पिटल येथे पुढील औषध उपचाराकरिता रूग्णवाहिकेमधून तात्काळ पाठवण्यात आले. त्यानंतर सदरची अपघातातील गाडी क्रेनच्या साह्याने बाजूला करून हायवेवरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# प्रशासकीय भवनाच्या विकासाचा मार्ग मोकळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल प्रशासकीय भवनाच्या जागेतील बचतधाममधील तीन गाळेधारकांनी १० वर्षांपूर्वी पनवेलच्या तहसीलदारांविरोधात दिवाणी न्यायालयात धाव घेऊन शासकीय जागेतील भाडेकरू असल्याचा दावा करून ही जागा ताब्यात राहण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा केला होता. हा दावा मागील आठवड्यात पनवेल जिल्हा दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्या सुनावणीत नामंजूर करण्याचे आदेश दिल्यामुळे पनवेलच्या प्रशासकीय भवनाच्या इमारतीचा संपूर्ण विकास करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी दिली.

जुन्या पनवेल तहसील कचेरीच्या कार्यालयालगत सुसज्ज इमारत बांधकामासाठी सर्व सरकारी कार्यालयांना स्थलांतरित केल्यानंतर तहसीलदारांनी जुन्या कचेरीलगतच्या सिटी सर्वे मालमत्ता क्रमांक ७०२ वरील ६३३.८ चौरस मीटरच्या क्षेत्रावर मुलकी बचतधाम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तळमजला आणि त्यावर एक मजला या इमारतीमधील गाळेधारकांना जागा स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर गाळेधारकांनी १९९९ सालच्या महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियमानुसार संबंधित जागेचा ताबा स्वत:कडे राहण्यासाठी न्यायालयात धाव घेत अलिबाग येथील कल्याणनिधीचे कुलाबा जिल्हा मुलकी सेवकवर्गाचे अध्यक्ष पनवेल तहसीलदारांविरोधात दावा केला होता. याच दाव्याचे प्रकरण न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्यासमोर सुरू होते. पनवेलचे तहसीलदार यांच्या वतीने सरकारी वकील श्रीमती एम. आर. थळकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. बचतधामला तीन गाळे या मालमत्तेत देण्यात आले होते. मात्र शासकीय जागेतील गाळेधारकांना महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम लागू होत नसल्याने हा दावा नामंजूर करण्यात आल्याचे आदेश न्यायाधीश सोनावणे यांनी दिले. संबंधित प्रकरणात न्यायालयातील सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निकाल मिळण्यासाठी १० वर्षे ११ महिन्यांचा कालावधी लागला. भवनाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे बांधकाम विभागाकडून सांगितले जात असून रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि सार्वजनिक बांधकाममंत्री यांच्या एकत्रित तारखा मिळत नसल्याने या भवनाचा लोकार्पण सोहळा पुढे ढकलला जात असल्याची चर्चा आहे. सध्या या इमारतीमधील पूर्वाश्रमीची सरकारी कार्यालये इतर भाड्याच्या जागेत सुरू आहेत.

# कोकणी मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनची सभा

**। पनवेल । वार्ताहर ।**

कोकणातील अनेक व्यक्ती आपापल्या कौटुंबिक गरजांची पूर्तता करण्यासाठी खारघर-तळोजा व जवळपासच्या परिसरात स्वत:ची घरे घेऊन, तर काही भाड्याने घरे घेऊन वास्तव्य करीत असताना त्यांना संघटित करून, त्यांच्या अडीअडचणीना एकमेकांची मदत व्हावी, सुख दुःखात हातभार लागावा, मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करून त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, त्यांचा चांगला विकास व्हावा व या पिढीचा उपयोग अधिक प्रभावशाली व्हावा अशा अनेक उद्देशाने काही समविचारी लोकांनी एकत्र येत चर्चा व्हावी व त्यांच्या या विचारातून समाजाचे भले व्हावें म्हणून अलिकडेच सभा बोलावण्यात आली होती.

या सभेला उद्योजक सुशिक्षित, अनुभवी व सामाजिक कार्यकर्ते व तरुण असे सर्व स्तरावरचे लोक एकत्र आल्याचे दिसून आले. या सभेत नौफिल सय्यद यांची सर्वानुमते कोकणी मुस्लिम वेलफेअर असोसिएशन तळोजा खारघर या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या सभेला शमीम तांबे, अमजद काद्री, नौफिल सय्यद, वसीम पारकर, फैसल शिवकर, तिसेकर, इक्बाल मुकादम, शकील जासनाईक आदी उपस्थित होते.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

# वयोश्री योजनेकडे वृद्धांची पाठ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वयोवृद्धांच्या मदतीसाठी सरकारने वयोश्री योजना सुरू केली आहे. त्याअंतर्गत त्यांना तीन हजार रुपये दिले जातात; मात्र त्यासाठी आवश्यक कागदपत्रे जमवण्यासाठी वृद्धांना करावी लागणारी धावपळ कित्येक पटीने जास्त आहे. ऊन-पावसात वयोवृद्ध बँका, तहसील कार्यालय, सेतू केंद्रात तासन् तास रांगेत उभे राहावे लागते. मात्र, आता रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी योजनेकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे.



जिल्ह्यात आतापर्यंत फक्त १८ हजार अर्ज समाजकल्याण विभागाकडे आले आहेत. परिपूर्ण अर्जांची तपासणी केल्यानंतर यातील साधारण चार हजार अर्जदार योजनेच्या लाभासाठी पात्र ठरवण्यात आल्याची माहिती जिल्हा समाज कल्याण विभागाने दिली. इतर जिल्ह्यांच्या प्रमाणात रायगड जिल्ह्याची आकडेवारी खूपच कमी आहे. योजनेतील क्लिष्टतमुळे तळा, म्हसळा, पोलादपूर, श्रीवर्धन या तालुक्यातील नागरिकांनी दमछाक टाळण्यासाठी वयोश्री योजनेतून काढता पाय घेतला आहे.

सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजना काढली आहे. योजनेअंतर्गत ६५ वर्षांवरील नागरिकांना तीन हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने यंदाच्या बजेटमध्ये ४८० कोटी रुपयांची तरतूदही केली आहे. लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये तीन हजार रुपयांसह वृद्धावस्थेमुळे ज्यांना ऐकण्यात, दिसण्यास आणि चालण्यास अडचण येते अशा वृद्धांना चष्मा, श्रवणयंत्रासह अनेक आवश्यक उपकरणे देण्यात येतात.वयोश्री योजनेचे लाभार्थी होण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे, बँक खात्याशी आधार कार्ड लिंक करावे लागते. यातील अनेक वृद्धांच्या हाताचे ठसे व्यवस्थित उमटत नसल्याने आधार कार्ड पुन्हा अपडेट करण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते, यासाठी उतारवयात तालुक्याला फेऱ्या मारणे खूपच त्रासदायक होत आहे.

> **रायगड जिल्ह्यात साधारण १६ हजार अर्ज आले आहेत. यातील आठ हजार अर्जांची डाटा एन्ट्री झाली असून चार हजार अर्ज योजनेसाठी पात्र होतील. मात्र, या योजनेसाठी असलेला निधी अद्याप आलेला नाही. योजनेचा लाभ एकदाच घेता येणार असून योजना मंजूर झाल्याच्या तारखेनंतर साहित्याची खरेदी केलेल्या वस्तूंची खरेदी पावती कार्यालयात पोच झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत.**
> **- सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड.**

ज्येष्ठ नागरिकांना वाढत्या वयानुसार विविध समस्या जाणवत असतात. त्याचबरोबर वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्राद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना महाराष्ट्र राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# आरोग्य शिबीर संपन्न

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील ग्रामीण जनतेचे आरोग्य चांगले राहावे यासाठी जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायणी कोयना येथे महाआरोग्य शिबीर नुकतेच घेण्यात आले. यावेळी जिल्हा शासकीय महाविद्यालयाचे डॉक्टर व त्यांच्या सहकार्यांनी शेडाशी ग्रामपंचायत हद्दीतील सात गावातील असंख्य नागरिकांची वैद्यकीय तपासणी केली व योग्य उपचार केले. तसेच ज्या रुग्णांना अधिकच्या वैद्यकीय उपचारांची गरज आहे त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या. या महाआरोग्य शिबिरात रक्तदाब, थायरॉईड, मधुमेह, हृदयरोग तपासणी इत्यादी तपासणीही करण्यात आल्या. सदर महाआरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी शेडाशी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश कदम, सामाजिक कार्यकर्ते अनिल पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. उपस्थितांचे स्वागत व आभार मायणी शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी केले.



# कीड रोग प्रादुर्भावाचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**। उरण । वार्ताहर ।**

सध्या पावसाच्या प्रमाणात खंड पडत असल्यामुळे करपा, कडकरपा, खोडकिडा व व पाणी गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, त्यामुळे चानजे तालुका उरण येथे क्रॉपसॅप अंतर्गत कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प अंतर्गत नुकतेच कृषी संशोधन केंद्र कर्जत येथील शास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत यांनी, मौजे चांजे येथे क्षेत्रीय भेटीचे आयोजन केले.

चाणजे येथील शेतकऱ्यांना कीड रोगाचा प्रादुर्भाव कसा व कुठे होतो व कोणत्या प्रमाणात होतो व तो कसा ओळखावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शेतात उंदराचे प्रमाण वाढत असल्याने भात पिकाचे पाने कुरतडून नुकसान झाल्याचे दिसून आले, तसेच त्यांनी कीड व रोगाबाबत उपाययोजना कोणत्या कराव्यात, खत व्यवस्थापन कसे करावे व किड नियंत्रणासाठी शेतात पक्षी थांबे उभे करण्याविषयी माहिती दिली.

क्रॉपसॅप कीड व रोग सर्वेक्षण अंतर्गत नियमितपणे ऑनलाइन सर्वेक्षण केले जाते त्याप्रमाणे शेतकऱ्यांना कीड व रोगाची एडवाईजरी व्हॉट्सॲप ग्रुप व भित्तिपत्रके या मार्फत दिली जाते तसेच दापोली विद्यापीठातून येणार एसएमएस शेतकऱ्यांना देण्यात येतात.

भेटीच्या वेळी कर्जत कृषी संशोधन केंद्र येथील कीड व रोग शास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, तनुजा घाडगे, कृषी पर्यवेक्षक सुरवसे, उरण तालुका कृषी पर्यवेक्षक बाळकृष्ण धेंडे, अलका बुरकुल व चाणजे कृषी सहाय्यक ए. एस. पानसरे तसेच महिला शेतकरी उपस्थित होते.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● उरण तालुक्यातील करंजा येथील हेमंत गौरीकर यांच्या निवासस्थानी प्रतिष्ठापना करण्यात आलेली ही कृष्णरूपी गणरायाची बालमूर्ती. (छायाचित्र : प्रसाद चौलकर, काव्य म्हात्रे)



● माणगाव तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ॲड. विलास गोठल यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)



● तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत महादेव रोडे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)



● चिरनेर मूळपाडा येथील अस्मित हिराजी ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली ही गणरायांची सुंदर सुबक गणेशमूर्ती. (छायाचित्र : काव्य म्हात्रे)



● श्री. प्रमोद अनंत शेलार, मु. रेवदंडा.



● श्रीवर्धन गाणी येथील प्रणेश रहाटबळ यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज. (छायाचित्र : उदय कळस)



● श्री. राजेंद्र चव्हाण व चव्हाण कुटुंबिय, मु. उसर, पो. पाबळ, ता. पेण यांच्या निवासस्थानी स्थानापन्न गणेशमूर्ती व सुंदर मनमोहक केलेली सजावट. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● श्री. भास्कर रामा घरत, मु. दिवीपारंगी, ता. अलिबाग चलचित्र देखावा. (श्री कृष्ण जन्म)



● मुरूडचे राष्ट्रवादीचे नेते मनोज भगत यांच्या घरची श्रीगणेशमूर्ती. (छायाचित्र : सुधीर नाझरे)



● माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगरातील सचिन गोरेगावकर (फेटेवाले) यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)



● सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रतीक खारकर मु. बामणगाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणराय. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रतीक खारकर मु. बामणगाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना मित्रपरिवार. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. दिलीप भगत, मु. बामणगाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. सागार नागावकर, मु. वढाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन गणेशभक्त. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. विजय भगत, मु. बामणगाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. नितीन खारकर मु. बामणगाव, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● राजाराम शिवराम जाधव मु. अपशिंगे, ता. कोरेगाव, जिल्हा सातारा यांच्या घरी विराजमान झालेले गौरी गणराया. (छायाचित्र : अनिल गवळे)



● श्री. सूरज भगत, मु. बामणगाव, ता. अलिबाग, यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. गजानन ठाकूर, मु. बामणगाव, ता. अलिबाग, यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. संकेत ठाकूर, मु. बामणगाव, ता. अलिबाग, यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक खारकर. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)